
# विश्व ध्वज




२५७
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १५७७
REFBK-0007640


फडफडे की ध्वज जिथ जरी ।
जागी युगायुगातुनि हा समरी ॥

शाहू

हुबळी.

[illegible]
अनुक्रम [illegible] वि: [illegible]
क्रमांक [illegible] नों: दि: [illegible]

अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ९५२१ नों: दि: २५/३/६७

# छिन्न-ध्वज

ग्रंथ संग्रहालय
७६४०

"शरद्"

REFBK-0007640
REFBK-0007640

१ मे १९५१

मूल्य अडीच रुपये

अजित प्रकाशन, बेळगांव.

मुद्रक व प्रकाशकः—

ए. पी. चौगुले, वीर-भारत प्रेस, बेळगांव.

सर्व हक्क सौ. उषादेवी मुझुमदार यांच्या स्वाधीन.

# ध्वजाचीं स्पंदनें.

' उंबरठ्यावर ' हें खुद्द कवीचें प्रास्ताविक वाचणारांना प्रस्तुत कवितासंग्रहाविषयीं निराळें कांहीं सांगावयाला नकोच. तथापि कवीचें मन मोडणें कठिण असल्यामुळें ध्वजाचा हा पार मी रचीत आहे.

ह्या कवितासंग्रहाचे निर्माते श्री. शरद् हे कारवारच्या सागरवेलेवर बसून स्वप्नरंजनांत रममाण होणारे कवि होत. त्यांच्या तसल्याच स्वप्न-रंजनाची साक्ष ' गोड आठवणी ' मधूनहि दिसून येईल. तथापि स्वप्न-रंजन हाच त्यांचा एकमेव धर्म नसून, सभोंवतीच्या जगाची, त्यांतील दलितांच्या आक्रंदनाची आणि हुतात्म्यांच्या असीम त्यागाची त्यांना पूर्ण जाणीव आहे. त्यांची अस्पृश्याबद्दलची सहानुभूति ' जगन्माता ' ह्या कवनांत आढळते. अस्पृश्यांना ज्या देवळांत प्रवेश नाहीं त्या देवळांत ज्या देवमूर्ति दिसून येतात त्या मूर्ति नव्हेतच—

" मूर्तींचीं प्रेतें उरलीं, त्या कधींच मूर्ती मेल्या "

अशी त्यांची भावना आहे. देव कुठें आहे, ह्या प्रश्नाचें उत्तर—

" अजि नांगर चरक्यांच्या या नवमूर्ती माझ्या झाल्या,
खोपटांत नांदतसे मी मजुरांच्या शेतकऱ्यांच्या. "

असा प्रत्यक्ष कालीमातेच्या तोंडूनच ते जबाब ऐकवितील.

एकंदरींतच, कालमानानुसार त्यांच्या कवितेचा ओघ वाहात आहे असें दिसेल. आयुष्याच्या— म्हणजे जाणतेपणाच्या— सुरुवातीस असणारा स्वप्नाळूपणा आणि प्रणयाकर्षण ह्या दुथडींना बिलगून त्यांच्या भावनांचा ओघ वाहात असताना आढळेल. ' निसर्ग संगीत', 'शरद्' ( पृ. २८ ), 'मधुराणी', ह्या कविता पाहाव्यात. पण कालमान जसजसें बदलत चाललें तसतशी त्यांच्या कवितेला वळणें वांकणें मिळत गेलीं. कांठावरील वृक्ष-

वेलींची प्रतिबिंबें सरित्प्रवाहांत पडावींत हें स्वाभाविकच होय. साम्राज्य-वाद्यांच्या जुलुमाचा प्रतिकार करण्यास सज्ज झालेल्या जनतेचीं लाठ्यांनी फुटणारीं डोकीं, कामकरी स्त्रियांचीं होणारी विटंबना, इत्यादींचा गढूळ-पणाहि त्या ओघांत प्रक्षुब्धतेनें उसळू लागला. दोन महायुद्धें पाहिलेला हा कवि. भारतांतील स्वातंत्र्यप्राप्तीच्या लढ्यांत अंगेजणीनें नसला तरी मनोभावें समरस झालेला हा कवि. महात्माजींच्या अहिंसामय क्रान्ति-संग्रामाचा साक्षीदार कवि. आणि स्वातंत्र्यप्राप्तीचा सुखसोहळा पाहिलेला हा कवि. काळपुरुषाच्या ह्या चालीचीं पदचिन्हें ह्या काव्यवाटिकेंत दिसून येतील. आणि म्हणूनच ' काव्यवाटिका ' हा शब्दप्रयोग साभिप्राय वाटेल. हा कवितासंग्रह रसिकांस सादर समर्पण करतांना ' यथाकालोद्भव पूजार्थें पुष्पाणि समर्पयामि' असाच मंत्र श्री. शरद् म्हणत असतील.

इतकें असलें तरी आजच्या ' नव ' कवितेंत आढळणारी जुगुप्सा किंवा मनोविकृती प्रस्तुत कवितासंग्रहांत नाहीं. ' उषा ' ह्या एकाच कवनांत मात्र कांहींशी अरुचकर अशी कल्पना करण्यांत आलेली आहे. उषा आणि प्रभाततारा ह्या युगुलाच्या प्रणयक्रीडेंत उगवत्या सूर्यानें व्यत्यय आणला, असा आशय त्या कवितेचा आहे. ज्याच्या हृदयांत कुजलेल्या वातावरणाची घाण आहे; जो विषयलंपट, मदोन्मत्त, धुंद आहे; नाजुक कोमल भावना मरून त्यांचीं प्रेते ज्याच्या उरांत कुजून चाललीं आहेत,—अशी उगवत्या रवीची त्यांनीं संभावना केली आहे. नेहमीच्या अगदीं वेगळ्या अशा ह्या अहेरानें रसिकतेला धक्का बसतो. पण १९२२ सालची —म्हणजे प्रारंभावस्थेंतील ही कविता आहे. ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे त्या कल्पनेकडे कानाडोळा करावासा वाटतो. बाकी प्रगल्भ दशेंतील कवितांत कल्पनेनें असा कविमनाचा बळी घेतलेला आढळत नाहीं. ' स्वातंत्र्यदिनाचा महोत्सव ' देखील त्यांच्या मनाची खिन्नता नष्ट करूं

शकत नाहीं. अन्न नाहीं, वस्त्र नाहीं, दाम नाहीं, धाम नाहीं ! अशा दैनावस्थेनें ते कमालीचे खिन्न होतात. तथापि एकंदरींत त्यांची वृत्ति आशावादी आहे.—

नांगर चरखा दोन आयुधें
करातिल जीवन सुखमय साधें .........
कविसृष्टींतिल, ऋषिहृदयांतिल
नव युग बाई जगिं उगवेल

हा गद्यमय वर्तमानपत्रस्वरूपी असला तरी ह्या आशावादानें त्याचें मन व्यापलें आहे. इ. स. १९२७ सालची ' शिशिर ' कविता *If winter comes, can spring be far behind* या उक्तीचा अभावितपणें अनुवाद ऐकवते. त्या नंतरची, १९३३ च्या आक्टोबरमधील ' स्वातंत्र्याचें बीज ' ही समग्र कविताच ह्या अर्थानें ओतप्रत भरली आहे. आणखी चारच वर्षांनीं लिहिलेल्या ' वणवा ' कवितेंत—

उदास उजाड हृदयीं उगवे
विचार एकचि तंव आशामय
' जुन्या जगाच्या चितेंतुनी तरि
जन्मा यावें नव युग सुखमय'

हा आशादायक सूर उमटत आहे. इतकेंच नव्हे तर, ' अमर विहंग ' ही कविता, चितारक्षेंतून पुन्हा जन्मणाऱ्या त्या ग्रीक पौराणिक पक्षाच्या कथेच्या आधारें तोच संदेश देत आहे. आणि नंतर एका तपानें लिहिलेल्या ' क्रान्ती ' कवितेंतही तोच आशावाद—

सांचुनि उरलेल्या शतकांच्या
राखेंतुनि कुजक्या राशींच्या
जीर्ण युगांतील जीर्ण जगाच्या
दग्धभूतुनी, जन्मा येई
नवयुग सुंदर, कांत !

अशा प्रभावी शब्दांनीं उफाळत आहे. आणि ह्याचें कारण असें सांगतां येईल कीं,

ती शूर धीर वृत्तीची
घन घडण तुझ्या हृदयाची
घडविति गिरि सागर साची

अशा भाषेंत ज्या महाराष्ट्राला ते गौरवतात, त्याच महाराष्ट्राच्या सर्व गुणधर्मांचा वारसा तें हक्कानें आणि अभिमानानें मिरवितातहि. तसें पाहिलें तर ( मराठीच्या उबदार कुशीपासून दूर असलेल्या ) सीमाभागांत ते गेलीं दोन तपें वास्तव्य करून आहेत. मराठी भाषिकांची कुचंबणा ह्या भागांत किती आहे तें सर्व विश्रुतच आहे. तरी, माय–मराठीची उपासना ते अनन्य निष्ठेनें करीतच आहेत. उत्तरेला ग्वाल्हेरीच्या पलीकडे असो वा तंजावराच्या पलीकडेही दक्षिणेला असो. मनाचा मराठा मराठीस भजणारच. ही जी त्यांची अनन्य भक्ती तीच एकंदर जागतिक परिस्थितिविषयीं विचार करतांना तरी गांगरून कशी जाईल?

बालपणींची निर्मल ऋजुता
शुचि ललनांची मधु मार्दवता
गोड फुलें हीं नव्या युगीं या
फुलतिल हृदयीं सकल जनांच्या
ललितकला ग निशिदिनिं भरतिल
घरोघरीं शुचि सौंदर्य जल

असाच दिलासा ती सगळ्यांना देईल.

बोरीबंदर स्टेशन– मुंबई
ता. २१– ४– १९५१ } यशवन्त दिनकर पेण्ढरकर.

# उंबरठ्यावर—

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
७४४०

(१)

माझ्या वयाच्या सोळाव्या वर्षापासून, पंचेचाळिसाव्या वर्षापर्यंतच्या दीर्घ कालावधींत लिहिल्या गेलेल्या माझ्या कवितांत, भिन्न, भिन्न व क्वचित् प्रसंगीं विरोधी अशा विचारसरणी आढळून येतात, त्यावद्दलचें विवेचन, व माझ्या लेखनांतील ध्येयांचें व मूल्यांचें विवरण या प्रस्तावनेंत मी केलेलें आहे.

तीस वर्षांच्या या दीर्घ कालावधींत, महाराष्ट्रांत एके काळीं गाजलेलीं "विविधज्ञानविस्तार" व "मनोरंजन" हीं मासिकें, ज्यांत माझ्या पंचविशीपर्यंतच्या बहुतेक सर्व कविता प्रसिद्ध झाल्या, तीं कालाच्या उदरांत नामशेष झालीं आहेत; जेव्हां मी माझी पहिली कविता लिहिली तेव्हां पहिल्या महायुद्धाचे मुंबर विझत चालले होते, भारतांत महात्मा गांधींच्या नेतृत्त्वाखालीं पहिल्या असहकारितेच्या चळवळीची प्रचंड लाट उसळली होती, एका विशाल देशांत जगास हादरून सोडणाऱ्या प्रचंड क्रांतीची ज्वाला पेटून तींतून एक नवीन संस्कृती उदयाचलावर तळपूं लागली होती; आणि मी माझी शेवटची कविता लिहिली, तेव्हां दुसऱ्या महायुद्धाचा शेवट होऊन त्याचे मुंबर धुमसत होते, शास्त्रज्ञांच्या केवळ कल्पनासृष्टींत आजवर वावरत असलेल्या प्रचंड अणुशक्तीच्या प्रात्यक्षिकाची नांदी झाली होती, शतकानुशतकें धडपडणारा, खंडप्राय, पुराण भारत परदास्यांतून मुक्त होऊन स्वतंत्र झाला होता, आणि उंबरठा ओलांडून स्वातंत्र्ययुगांत पहिलें पाउल टाकीत असलेला भारत १९२० सालीं स्वातंत्र्ययुद्धाची पहिली तुतारी फुंकणाऱ्या अमर महात्माजींना कायमचा मुकला होता! या तीस वर्षांत उठलेले जगास हादरून सोडणारे विचारप्रवाह लेखकाच्या हृदयावरही आघात, प्रत्याघात करीत होते!

दृश्यें, घटना, विचार यांच्या आघातानें होणाऱ्या हृदयवीणेच्या तारांच्या स्पंदनांतून उत्पन्न झालेले शब्दसंगीत म्हणजे काव्य असें म्हणतां येईल. दृश्यें, घटना त्याच असूनसुद्धां हृदयाच्या तारा छेडणारे भिन्न विचार प्रवाह भिन्न, भिन्न शब्दसंगीत हृदयांत निर्माण करितात. शरद्-ऋतूंतील प्रभातसमयीं सखीसमवेत सहल करावयास गेलल्यावेळचें दृश्य पाहून, आनंदभरीत हृदयांतून व्यक्त झालेलें वर्णन ("शरद्," पान २८), व दुसऱ्या प्रसंगीं, आजारी, दरिद्री शेतकऱ्याच्या झोपडीतून बाहेर पडलेल्यावेळीं चाललेल्या खिन्न विचारांच्या आघातांनीं, हृदयांतून तेंच दृश्य पाहून उसळून आलेलें वर्णन "शरद्,"(पान ६), या दोन्हींत चित्रीत झालेलीं शब्दचित्रें किती भिन्न आहेत! विचारांचें तेंच विचारसरणीचें! जगांतील नव्या, नव्या विचारप्रवाहांच्या हादऱ्यानें, लेखकाच्या विचारांचीं क्षितिजें वयाबरोबर उत्तरोत्तर विकास पावत गेलीं, अधिकाधिक विशाल होत गेलीं, आणि त्यास अनुसरून, साहजिकच लेखकाच्या लेखनांतही क्रमाक्रमानें परिवर्तन होत गेलें. तारांकित आकाशाकडे-अनंत विश्वांनीं गजबजलेल्या अथांग अवकाशाकडे पहात बसलेल्यावेळीं, अथांग सृष्टीच्या निर्मात्याबद्दलचें गूढ उकलण्याचें प्रयत्न करणाऱ्या, परंपराशील, श्रद्धाशील, हिंदु हृदयांतून स्फुरलेली कविता, "लपंडाव" (पान ३२), आणि बुद्धीच्या अग्नींतून तावून, सुलाखून बाहेर पडलेल्या, प्रगल्भ, विचारशील, स्वतंत्र मानवी हृदयांतून बाहेर पडलेल्या "अज्ञेयवाद्याचा सवाल"(पान ३४) आणि "आस्तिक" (पान ८४) या कविता, या दोन्हींतील कालाचें अंतर बारा वर्षांहून अधिक आहे. जगांतील मानवी विषमता व अन्याय पाहून खिन्न झालेल्या, आशावादी हृदयांतून बाहेर पडलेल्या ,विशींत लिहिलेल्या "आशागीत," (पान २) व "भूमाईची अंगाई," (पान १०) या कविता आणि तिशींत लिहिलेल्या "एक जग" (पान ८९), व "माझें मरण" (पान १०३), या कविता, यांतील मध्यवर्ती कल्पना एकच आहेत; पण, नंतरच्या कवितांत, मानवी विषमतेच्या व अन्यायाच्या कारणांची मीमांसा सखोल, शास्त्रशुद्ध विचारसरणींतून उगम पावलेली आहे. विशींच्या उंबरठ्यांत पदार्पण करीत असतांना लिहिलेलें

" जयंती " (पान ४० ), हें माझें छोटें खंडकाव्य मला फार आवडतें; पण, तें वाचीत असतांना, तें माझें नसून, एखाद्या जुन्या जमान्यांतील कवीचें असल्याचा मला भास होतो! हीं मी कांहीं ठळक उदाहरणें दिलीं आहेत पण, क्रमशः होत गेलेल्या माझ्या विचारसरणींतील परिवर्तनाच्या बदलत्या छटा माझ्या लेखनांतून क्रमाक्रमानें नकळत उमटत गेलेल्या आढळून येतात.

[ २ ]

## माझ्या तीस वर्षांतील कवितांचे विहंगमावलोकनः—

**समता-स्वातंत्र्याच्या कविताः**– भारताच्या स्वातंत्र्याची तळमळ व्यक्त करणारी माझी पहिली कविता "सोन्याचा दिवस कधीं येणार" (पान १८), मी १९२९ च्या जानेवारी महिन्यांत लिहिली, आणि नंतर १९३० सालच्या आंदोलनाच्या कालांत, पिळवटलेल्या हृदयांतून, "स्वातंत्र्याचे मोल" (पान १२) "वीर" (पान ५१), "अमर विहंगम" (पान ७१), "स्वातंत्र्याचें बीज" (पान ६३)' "निर्झर" (पान ५८), या कविता लिहिल्या गेल्या; याच कालांत, जगांतील कामकऱ्यांना, जगांत स्वातंत्र्य, समता व शांती प्रस्थापित करण्याकरितां, जगांतील साम्राज्यशाहीविरुद्ध शस्त्रें खालीं ठेऊन, निःशस्त्र, अहिंसात्मक लढा उभा करण्यास आव्हाहन करणारी "एक जग" (पान ८९), ही कविता लिहिली गेली. १९३० च्या आंदोलनांत, स्वातंत्र्याकरितां लढणाऱ्या शूर स्त्रियांवर झालेल्या अत्याचारांचें वृत्त ऐकून व्यथित झालेल्या अंतःकरणांतून, जुलमी अत्याचारास बळी पडलेली स्त्री निरंतर पवित्र व निर्मल असते, असें प्रतिपादन करणारी " निर्मला " ( पान ७५ ) ही रूपक कविता लिहिली गेली. आणि ज्यावर्षी जगांत लोकशाहीचा लढा कळसास पोंचला होता, पश्चिमेस फॅसिझमविरुद्ध लोकशाही व पूर्वेस हिंदुस्थानादि वसाहतींत साम्राज्यशाहीविरुद्ध लोकशाही, असा लढा आणीबाणीच्या बिंदूस येऊन ठेपला होता, अशा इतिहासांत अजरामर झालेल्यां १९४२ सालीं,

माझ्या हातून, "माझे मरण" (पान १०३), व "फडफडे वरी ध्वज छिन्न जरी !"(पान १), या कविता लिहिल्या गेल्या. १९४७ सालीं, भारताच्या स्वातंत्र्यदिनाच्या दिवशीं सकाळीं, अरुणोदयाची पाउलें पूर्वक्षितिजावर उमटत असतांना, आणि संध्याकाळीं, सायंकालच्या छाया पृथ्वीतलावर जमत असतांना, माझी दुसरी "सोन्याचा दिवस" (पान २१), ही कविता लिहिली गेली; त्याच वर्षी, स्वातंत्र्याच्या वेदीवर स्वतःचें बलिदान केलेल्या हुतात्म्यांच्या ज्योतींनीं दीप्त झालेल्या दीपावलीच्या मंगल दिनीं "स्वातंत्र्य दीपावली" (पान ७२), ही कविता लिहिली गेली, आणि १९४८ च्या फेब्रुवारीच्या १२ तारखेच्या दिवशीं, अश्रूंनीं भारावलेल्या माझ्या हृदयांतून, अमर गांधीजींना काव्यपुष्पाची नम्र श्रद्धांजलि (पान ९३) वाहिली गेली

**प्रेमाच्या कविता** -माझ्या विशींतील प्रेमाच्या कविता संन्यस्त प्रेमाच्या आहेत, कर्तव्यासाठीं एकमेकांचा दीर्घकाल वर्षानुवर्षे विरह सहन करण्यास तयार असलेल्या, नी विरहांत प्रेमाची ज्योत अखंड, अविरत तेवत ठेवणाऱ्या प्रणयी युगुलांच्या आहेत. स्वातंत्र्याच्या पहिल्या, आंदोलनाचे निखारे धगधगत असतांना, १९२१ सालीं, वयाच्या अठराव्या वर्षी सुरू करून १९२३ सालीं पुऱ्या केलेल्या माझ्या "जयंती" या खंडकाव्यांत, देशास स्वातंत्र्य लाभेपर्यंत संन्यस्तवृत्तीनें राहण्याचा निर्धार केलेल्या प्रेमी जोडप्याची कथा गुंफलेली आहे. १९२६ सालीं लिहिलेल्या "संन्यासिनी" (पान ७) या कवितेंत, दहा वर्षांच्या अनिमिष, दीर्घ विरहानंतर प्रथमच भेटलेल्या प्रियकरास प्रणयिनीच्या तळमळणाऱ्या संयमी हृदयांतून रणांगणावर जाण्यास दिला गेलेला निरोप आणि रणांगणावर विजय संपादन करून धारातीर्थी पडलेल्या मृत प्रियकराचा तिच्या विछिन्न भग्नहृदयानें केलेला गौरव हीं आहेत. "नंदादीप" (पान २९), "प्रेमाचा ध्रुव," (पान ६६), निरोप (पान २५), "भग्नहृदय" (पान ७३), या कविता याच कालांतल्या आहेत. १९२२ च्या शरद्-ऋतूंत, फर्ग्युसन कॉलेजच्या वसतीगृहाच्या खिडकींतून, प्रभाततारांकित

पूर्वक्षितिजावर दिसणारें उषःकालचें मनोज्ञ दृश्य पाहून, "उषा" (पान १४) या प्रेमकथापर रूपक कवितेचा जन्म झाला. १९३२ सालीं लिहिलेल्या दुसऱ्या "उषा" (पान ६९), या कवितेंत, नी १९३३ सालीं लिहिलेल्या "मधुराणी" (पान ५६), या कवितेंत, प्रियतमेनें प्रियकराच्या आयुष्यांत पदार्पण करून, निर्माण केलेल्या चैतन्यमय नवजीवनाचें वर्णन आहे. १९४७-४८ सालीं लिहिलेल्या "स्वप्नमय सागरवेला" (पान ८७), नी "गोड आठवणी" (पान ८५), या निसर्गसौंदर्याच्या शब्दचित्रांनीं खचून भरलेल्या कवितांत, नाजूक कुंचल्यानें प्रियकर प्रणयिनीचा प्रेमविहार सूचित केलेला आहे.

**इतर विविध कविता**-- माझ्या इतर कवितांपैकीं, १९२१ सालीं पहिल्या महायुद्धाचा वणवा विझून त्याची राख उडत असतांना लिहिलेल्या "झंजावात" (पान २७), या कवितेंत, जुलुमी हुकुमशहाच्या अत्याचारी विध्वंसाचें व त्याच्या अंतिम विनाशाचे वर्णन आहे. १९३५ सालीं, स्पॅनिश यादवी युद्धाचा डोंब पेटलेल्यावेळीं लिहिलेल्या "वणवा", (पान ७०), या कवितेंत दुसऱ्या महायुद्धाचें भविष्य निवेदन केलेलें असून, या भावी अघोर मानवी वणव्यांतून, मानवतेच्या अपार हाल-अपेष्टांतून तरी नव्या समता-शांतिमय जगाचा उदय होवो, अशी आशा व्यक्त केलेली आहे. अस्पृश्यतेच्या अन्यायानें विटलेल्या, चिडलेल्या हृदयांतून, "जगन्माता" (पान २९) ही कविता उसळून आलेली आहे. ध्येयवाद्याची अचल निडरता "ध्येयध्वजा" (पान ६४) या कवितेंत वर्णिलेली आहे. "अंगाईगीत" (पान ५५), आणि "भगवा झेंडा" (पान ६१), या कवितांत, स्वातंत्र्यप्रिय, त्यागी, रणझुंजार महाराष्ट्राचा गौरव केलेला आहे. "जयहिंद! चिरंतन हिंद!" (पान ९४) या कवितेंत, समृद्ध, सुखी अशा भविष्यकालीन नवभारताचें चित्र रेखाटलेलें आहे, "क्रांती" (पान ९६) या कवितेंत, क्रांतीची विराट, विनाशक व विधायक शक्ती वर्णिलेली आहे, "दौडत येत अरूण" या कवितेंत,

मागसलेल्या पूर्वेंत, दुसऱ्या महायुद्धाच्या उत्तरार्धांत सुरू झालेल्या सर्व-व्यापी क्रांतीच्या लाटेचें चित्रण केलेले आहे. आणि "अनंतता आणि मानव" (पान २४), या कवितेंत अनंत काल नी अनंत अवकाश यांच्या महासागरांत कस्पटाप्रमाणें भासणाऱ्या भूगोलावर वास करणाऱ्या मानवतेचा अहंकार किती फोल आहे, हें निदर्शित केलेलें आहे.

[ ३ ]

मानवी ध्येयवाद आणि लालित्य यांच्या सुंदर मिलाफानें जी ललित-कृती निर्माण होते ती ललितकला. जगांतील कलावंतांनीं आजवर निर्मिलेले वाङ्मय, चित्रकला, शिल्पकलादिकांचे उत्तमोत्तम नमुने मानवी ध्येयाचा सुवर्णरस सौंदर्याच्या मुशींत ओतून निर्मिलेली आहेत! सौंदर्यमय परिपूर्ण जीवन हेंच कलेचें ध्येय (पान ९३, 'कला आणि जीवन'), या ध्येयाचा अंतःप्रवाह वहात असलेल्या माझ्या हृदयांतून जेव्हा, जेव्हां, प्रेरणा झाली, तेव्हां, तेव्हां, मी लेखणी हातांत घेतली आणि लेखन केलें. माझ्या ध्येयाच्या कसोटीस माझें लेखन कितपत उतरलें आहे, हें माझा महाराष्ट्रांतील वाचकवृंद ठरवील.

या कवितासंग्रहाला मी "छिन्नध्वज" हें नांव दिलें आहे. १९४२ च्या सप्टेंबरमध्यें लिहिलेल्या "फडफडे वरी ध्वज छिन्न जरी!" (पान १) या कवितेवरून हें नांव मला सुचलें. या कवितेंत वर्णिलेला हा छिन्न ध्वज कोणता? हा कोणी उभारला नी फडकत ठेवला? मानवतेच्या अंतिम सुखाकरितां, जगांत स्वातंत्र्य, समता, बंधुता नी चिरंतन शांतता स्थापण्याकरितां, देशोदेशीं, शतकाशतकांतून जे वीर जगले, लढले नी पडले, त्या सर्वांनीं हा ध्वज उभारला आणि युगायुगांतून उंच फडकत ठेवला! जुलमी सरंजामशाहीच्या कडेकोटावर पहिला हल्ला चढविणाऱ्या फ्रेंच राज्यक्रांतीच्या क्रांतिवीरांनीं हा ध्वज फडकविला; १९१७ सालीं, लोभी

भांडवलशाही आणि युद्धपिपासु साम्राज्यशाही यांच्यावरील हल्ल्याची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या रशियन राज्यक्रांतीच्या क्रांतिवीरांनीं हा ध्वज फडकविला; १९४२ सालीं, लोकशाहीच्या रक्षणाकरितां फॅसिझमविरुद्ध लढलेल्या देशोदेशींच्या व स्टालिनग्राडच्या शूर वीरांनीं, आणि साम्राज्यशाहीस हुसकून लावण्याकरितां भारतांत व पूर्वेकडील इतर वसाहतींत जिवाची कुरवंडी करून लढलेल्या स्वातंत्र्यवीरांनीं हा ध्वज फडकविला! ख्रिस्त, बुद्ध, मार्क्स, लेनिन, महात्मा गांधी या थोर पुरुषांनीं हा ध्वज फडकविला! मानवी ज्ञानांत भर घालण्याकरितां झटलेल्या गॅलिलियो ब्रुनो पास्टरसारख्या विज्ञानांनीं, अन्याय्य रूढींविरुद्ध बंड करून, उच्च मानवतेच्या धर्माचा जयघोष करणाऱ्या ज्ञानेश्वरादि संतांनीं हा ध्वज फडकविला! उच्च मानवी ध्येयांनीं प्रेरीत होऊन, देशोदेशीं, युगायुगांतून धारातीर्थी पडलेल्या सर्व लहानथोर हुतात्म्यांच्या रक्तानें भिजून हा लाल झालेला आहे. प्रतिगाम्यांच्या, स्वातंत्र्यशत्रूंच्या हल्ल्यांनीं हा छिन्नविच्छिन्न झालेला आहे! हा ध्वज, बंधुता, समता, मानवता नी स्वातंत्र्य यांचा निदर्शक हा ध्वज अखंड अजेय राहील, छिन्न झाला तरी निधड्या छातीच्या वीरांच्या हातांत उंच उभा डौलानें फडकत राहील, आपला उज्ज्वलसंदेश फडकवीत, उंचावर फडकत राहील!

आज मानवता एका आणीबाणीच्या बिंदूवर येऊन ठेपलेली आहे! अणुबॉम्बच्या भीषण, काळ्या, घनदाट छायेखालीं, मानवता चिंताक्रांत अंतःकरणानें भविष्याच्या अंधुक, हिममय क्षितिजाकडे डोळे फाडून पहात आहे! माझे गाढ आशावादी मन मला ग्वाही देतें कीं, भविष्यकाळांत, मानवी बंधुत्त्वाच्या नी समतेच्या तत्त्वांचाच अंतिम विजय होईल, आणि मानवतेच्या शिरावर लटकत असलेला, विनाशक शक्तींचा प्रतीक हा अणुबॉम्ब कधींही स्फोट पावणार नाही! भविष्यकाळांतील दूरदूरच्या क्षितिजांवर, चित्रित होणारीं मानवतेचीं संस्कृतीच्या प्रगतीपथावरील पावलें माझ्या मनश्चक्षूंस दृग्गोचर होत आहेत! दूरच्या भविष्यकाळांत, आजचें समतायुग

पूर्णावस्थेस पोंचून, बंधुभावानें एकत्रित झालेल्या, पृथ्वीतलावरच्या द्विशतकोटी मानवकंठांतून निघालेल्या "जय मानवता!" "जय भूमाता!" या गंभीर घोषणांनीं पूर्व व पश्चिम महासागर आणि दोन्ही ध्रुव निनादत आहेत, अहिंसेच्या शांतिमय आकाशाखालीं, मानवी बंधुत्वाचा नी समतेचा हा ध्वज, अविच्छिन्न असा, उंच, उंच गगनमंडळांत, सूर्याच्या सुवर्ण प्रकाशांत तळपत फडकत आहे, असें उज्ज्वल भविष्यकाळचें चित्र माझ्या मनश्चक्षूसमोर उभें रहात आहे!

कारवार.
१५-१२-१९४८.

शरद्.

# वाचकांच्या हातांत देतां-देतां,

प्रस्तावना लिहिल्यानंतर जवळजवळ सव्वादोन वर्षांनीं कवितासंग्रह वाचकांच्या हातीं देण्याचा हा योग जुळून येत आहे. सव्वादोन वर्षांचा हा काल ऐतहासिक घटनांनीं ओतप्रोत भरलेला असा गेला. मानवता आज विसाव्या शतकाच्या उत्तरार्धाच्या उंबरठ्यावर विचारमग्न उभी आहे; गेल्या शतवर्षांचें सिंहावलोकन करण्यांत, जुन्या मूल्यांचें परीक्षण करण्यांत, आणि भविष्यकाला-बद्दलच्या गाढ चिंतनांत ती निमग्न झालेली आहे !

प्रस्तावनेनंतरच्या या सव्वादोन वर्षांच्या कालावधींत लिहि-लेल्या माझ्या कवितांपैकीं, "जयघोष करा !" "जय जय महाराष्ट्र-देशा !" आणि "नवोदित चीन" या तीन कविता या संग्रहांत घातलेल्या आहेत.

संग्रह वाचकांच्या हातांत देण्यापूर्वीं एक गोड कर्तव्य मी उरकून घेऊं इच्छितों. तें कर्तव्य आभारप्रदर्शनाचें पहिले आदरयुक्त आभार मी कै० रावसाहेब मोरमकर यांचे मानतों. त्यांनीं १९२३ सालीं, मी नुकताच पदवीधर होऊन विशींत पदार्पण करीत असतांना

माझे " जयंती " हें खंडकाव्य वाचून, प्रशंसापर उद्गार काढले, आणि आपल्या " विविधज्ञानविस्तार " मासिकांत तें प्रकाशीत केलें. यानंतर ज्यांच्या प्रेमळ तगाद्यामुळें माझीं संकलित प्रकाशनें जन्म घेत आहेत, त्या माझ्या मित्रवर्य श्री. वा. रं. सुंठणकर यांचे मी मन:पूर्वक आभार मानतों. त्यांचा तगादा नसता तर माझ्या प्रसिद्धी-विन्मुख व सुस्त स्वभावामुळें माझ्या हयातींत या प्रकाशनांनीं सूर्यप्रकाश पाहिला असतां कीं काय याची वानवाच आहे! श्री. वा. रं. सुंठणकर यांचें माझ्यावरील उपकारांचें ओझें तर फारच मोठे आहे! त्यांनीं चिकाटीनें मुद्रण करून घेण्याचें व प्रुफें तपासण्याचें कटकटीचें व किचकट काम, मित्रप्रेमानें अंगावर घेऊन, जातीनें हें प्रकाशन तडीस नेलें. यशवंतकवि गेल्या ऑक्टोबरमध्यें कारवारला आलेल्या वेळीं, प्रा. य. द. भावे यांनीं त्यावेळीं माझा अर्धामुर्धा छापलेला कवितासंग्रह त्यांना दाखविण्याचा आग्रह केला, याद्दल मी प्रा. भाव्यांचा फार आभारी आहे. ( प्रा. भावे स्वत: नवकवि आहेत, पण त्यांना माझ्या जुन्या धर्तीच्या कविता फार आवडतात ) कारण, माझ्या भिडस्त संकोची वृत्तीमुळें, प्रा. भाव्यांच्या आग्रहाशिवाय यशवंतांना माझा काव्यसंग्रह दाखविण्याचें माझ्या हातून घडलें नसतें, आणि माझ्या " छिन्नध्वजा"स यशवंतांच्या कलापूर्ण कविहृदयानें रचलेल्या, सुंदर, अमोल संगमरवरी "पारा"चा अलभ्य लाभ झाला नसता. परिषदेच्या अध्यक्षपदाच्या कामांतून काव्यगायनाच्या व व्याख्यानांच्या दौऱ्यांतून फुरसतींत फुरसत काढून, कवि यशवंतांनीं संपूर्ण संग्रह वाचून लिहिलेल्या, रसाळ, मार्मिक प्रस्तावनेबद्दल मी

कवि यशवंतांचा अत्यंत ऋणी आहे. माझ्या काव्यसंग्रहाचे मुद्रक व होतकरू प्रकाशक श्री. चौगुले यांचे आभार मानतों. कारण, बडे प्रकाशक ( पाठ्य पुस्तकें व धार्मिक ग्रंथ छापणे, हेंच आपलें इतिकर्तव्य समजणारे ) ललित प्रकाशनें व विशेषतः काव्यप्रकाशनें हातांत घेण्यास बिचकत असलेल्या, या मंदीच्या कालांत, श्री. चौगुलेनीं सहजस्फूर्तीनें व हौशीनें हें प्रकाशन हातीं घेतलें.

आज, विसाव्या शतकाच्या उत्तरार्धाच्या पहिल्या मे-दिनाच्या दिवशीं, मी माझा हा "छिन्नध्वज" कवितासंग्रह महाराष्ट्रांतील रसिकांच्या हातीं देत आहे.

कारवार
१ मे १९५१

शरद्.

———

# प्रस्तावनांकरितां शुद्धिपत्रक.

## ध्वजाचीं स्पंदनें.

| पृष्ट. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १ | ८ | आसीम. | असीम. |
| ३ | १९ | त्रिहंग. | विहंगम. |
| ३ | ३३ | राखेंतून. | राखेतुंनि. |
| ४ | १६ | निर्बल | निर्मल |

## उंबरठ्यावर.

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | १४ | माझ्या | माझा. |
| ७ | १८ | अणुवाँबच्या | अणुबाँबाच्या. |

## वाचकांच्या हातांत देतां, देतां—

| | | | |
|---|---|---|---|
| २ | ४ | श्री. बा. रं. सुंठणकर यांचे | श्री. बा. रं. सुंठणकर आणि श्री. स. रं. सुंठणकर यांचे |
| ३ | २ | यांचे आमार | यांचे मी आभार |

# समर्पण

देशोदेशींच्या दलितांच्या राखेवर वाहिलेली फुलांची ओंजळ.

युगायुगांतुनि, समतेच्या शुभ,
नव्या युगाच्या आशेवरतीं,
जगलेल्या अन् रणिं पडलेल्या
दलितांच्या शुचि राखेवरतीं—
वाहितसे मी शारद सुमनें
अश्रुंदवानें थबथबलेलीं,
हृदयोद्यानीं, वेळोवेळीं
आशावेलीवरि फुललेलीं.

*   *   *

नव्या युगाचा सुभग वसंत
येइल एक दिनीं सुमभरित;
फुलविल उज्ज्वल मधु-फुलवंती
विस्मृत दलितसमाधींवरतीं.

शारद्.

ऑगस्ट १९३७.

# अनुक्रमणिका.


| कविता | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | फडफडे वरी ध्वज छिन्न जरी ! | १ |
| २ | आशागीत | २ |
| ३ | शरद् | ६ |
| ४ | संन्यासिनी | ७ |
| ५ | हिमगीत | ९ |
| ६ | भूमाईची अंगाई | १० |
| ७ | स्वातंत्र्याचे मोल | १२ |
| ८ | उषा | १४ |
| ९ | सोन्याचा दिवस कधीं येणार ? | १८ |
| १० | सोन्याचा दिवस | २१ |
| ११ | गरीबांच्या कहाण्या | २३ |
| १२ | अनंतता आणि मानव | २४ |
| १३ | शिशिर | २५ |
| १४ | निरोप | २५ |
| १५ | झंजावात | २७ |
| १६ | शरद् | २८ |
| १७ | नंदादीप | २९ |
| १८ | जगन्माता | २९ |
| १९ | लपंडाव | ३२ |
| २० | राजाची संपत्ति | ३३ |
| २१ | अज्ञेयवाद्याचा सवाल | ३४ |
| २२ | रसवंतीची फिर्याद | ३५ |
| २३ | आई | ३७ |
| २४ | जयंती | ४० |
| २५ | केसरी | ५० |
| २६ | वीर | ५१ |
| २७ | बालक आणि पक्षी | ५३ |
| २८ | अंगाईगीत | ५५ |
| २९ | मधुराणी | ५६ |

| कविता | पृष्ठ |
|---|---|
| ३० निर्झर | ५८ |
| ३१ फुलपांखरूं | ६० |
| ३२ भगवा झेंडा | ६१ |
| ३३ स्वातंत्र्याचे बीज | ६३ |
| ३४ ध्येय-ध्वजा | ६४ |
| ३५ भू-गोल | ६५ |
| ३६ प्रेमाचा ध्रुव | ६६ |
| ३७ उषा | ६९ |
| ३८ वणवा | ७० |
| ३९ अमर विहंगम | ७१ |
| ४० स्वातंत्र्य-दिपावली | ७२ |
| ४१ भग्नहृदय | ७३ |
| ४२ निर्मला | ७५ |
| ४३ हांस ! मधुर तूं हांस ! | ८३ |
| ४४ आस्तिक | ८४ |
| ४५ गोड आठवणी | ८५ |
| ४६ स्वप्नमय सागरवेला | ८७ |
| ४७ एक जग | ८९ |
| ४८ स्वातंत्र्यदिनाचा महोत्सव | ९१ |
| ४९ अमर गांधीजींस श्रद्धांजलि | ९२ |
| ५० कला आणि जीवन | ९३ |
| ५१ जय हिंद ! चिरंतन हिंद ! | ९४ |
| ५२ दौडत येत अरूण | ९५ |
| ५३ क्रांती | ९६ |
| ५४ निसर्गसंगीत | ९८ |
| ५५ जयघोष करा ! | ९९ |
| ५६ जय जय महाराष्ट्रदेशा ! | १०० |
| ५७ नवोदित चीन | १०२ |
| ५८ माझे, मरण | १०३ |

---

# शुद्धिपत्रक.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ४ | ११ | भंगुनि | भंगुनी |
| ४ | १५ | वक्षावरी | वक्षावरि |
| ५ | १३ | निघुनि | निघुनी |
| ८ | १३ | मारुनी | मरुनी |
| ९ | १२ | मुद्रें | मुदें |
| १० | १५ | प्रगटवुनियां | प्रगटवुनीयां |
| १५ | ७ | सोडवुनि | सोडवुनी |
| १७ | २ | मूर्तीं | मूर्तिं |
| २५ | ५ | सृष्टीच्या | सृष्टिच्या |
| २५ | ११ | सम्राटपदही | सम्राट्पदही |
| ३० | ९ | मिटुनि | मिटुनी |
| ३० | १३ | खोंपटांकडे | " खोपटांकडे |
| ३३ | ६ | न्हदयीं | हृदयीं |
| ३५ | १४ | सोडुनि | सोडुनी |
| ३६ | ४ | कविरुवांचे | कविरुवांचे |
| ३७ | २ | ती | तीं |
| ३८ | १२ | स्वदृष्टी | स्वदृष्टि |
| ४४ | १७ | होउनि | होउनी |
| ४६ | १३ | मरून | भरुन |
| ४६ | १४ | बसुनि | बसुनी |
| ४६ | १६ | बघुनि | बघुनी |

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ४७ | ११ | निमीषीं | निमिषीं |
| ४८ | २ | मूर्तींकारें | मूर्तीकारें |
| ६० | ९ | पानांमधुनि | पानांमधुनी |
| ६२ | १६ | जोंवरि | जोंवरी |
| ६४ | २ | मध्यवरि | मध्यावरि |
| ६४ | १५ | शांति | शांती |
| ६६ | ९ | दृष्टी | दृष्टि |
| ६७ | ८ | बोले | बाले |
| ६८ | ७ | तुजविण | तुजवीण |
| ७० | ७ | बार्के | बांके |
| ७३ | १६ | मनुज किनाऱ्यापासुनि | मनुज- -किनाऱ्यापासुनि |
| ७५ | १२ | मूर्ती | मूर्ति |
| ७६ | १० | देईन | देइ न |
| ७९ | ४ | खुलनि | खुलनी |
| ८० | २० | उन्मळुनिया | उन्मळुनीया |
| ८१ | ६ | हिसकुनी | हिसकुनि |
| ८२ | ५ | हादरुनी | हादरुनि |
| ८२ | ५ | स्फुंदस्फुंदुनी | स्फुंदस्फुंदुनि |
| ८३ | ४ | गंहिवरुनियां | गंहिवरुनीयां |
| ८३ | ८ | नाथ पदीं | नाथ- -पदीं |
| ९१ | १२ | नभजयघोषें | नभ जयघोषें |
| ९३ | १६ | ललितकलाकृति | ललितकलाकृती |
| ९४ | २ | तव जनतेच्या | नव जनतेच्या |
| ९६ | १ | नव | नच |
| ९८ | ५ | झडुनि | झडुनी |

## १ फडफडे वरी ध्वज छिन्न जरी !

दा. क्र. ७०८०

फडफडे वरी, ध्वज छिन्न जरी !
जगिं युगायुगांतुनि हा समरीं !
देशोदेशींच्या वीरांच्या
रुधिरें भिजला जो शूरांच्या
रणिं समतेच्या, स्वातंत्र्याच्या,
आरक्त, अचल ध्वज उभा वरी !
॥ फडफडे० ॥ १

टेकुनियां खडकावार पाठ,
निज छातींचा करुनी कोट,
भंवती लढती नरवर धीट;
ध्वज राहिल फडकत घन समरीं !
॥ फडफडे. ॥ २

वेदीवरि जन-स्वातंत्र्याच्या
उत्सुक प्राणाहुति अर्पाया
अखंड रांगा हुत आत्म्यांच्या
ध्वज धरितिल अविरत उंच करीं !
॥ फडफडे. ॥ ३

ध्येयनिरत, कणखर हृदयाचे
सैनिक समता-स्वातंत्र्याचे

शिखर गांठतां उंच यशाचें
जयशाली ध्वज फडकेल वरी !
॥ फडफडे. ॥ ४

मृतवीरांच्या स्मृतिनीं मंगल
युवकहृदयिं त्या नव्या युगांतिल
स्फूर्तिदीपिका उजळित उज्ज्वल
फडकेल ~~सुमम~~ अमर ध्वज घरोघरीं !
॥ फडफडे. ॥ ५

सप्टेंबर १९४२.

## २ आशागीत

(चाल —एकतारीची)

एकलकोंडा काळा खडक,
वरि बसलेली बाला एक;
सभोंवतालीं सागर खोल,
पसरे वरतीं नभ तें नील;
सिंधुतलीं स्फुट फेनिल लहरी,
स्फुरती तारा नील अंबरीं। १

दिव्या बाला गाई गाणें
अनुकंपामय मंजुरवानें;
तारा मिळविति मृदु निज सूर,
मिसळे मंजुळ सागरमर्मर;
मंद समीरणिं भुरभुर नाचत,
धरिती ताला कुंतल मुक्त;
त्या तालावरि ताराकिरण
तरल तरंगीं करिती नर्तन.
स्फुंदत, स्फुंदत, पवनावरती
पसरे बाला-गीत दिगंतीं. २

" बाई वसुधे, कां दिनवाणी
बसशी आणित अश्रू नयनीं ?
रात्र गडे ही निघुनी जाइल
चैतन्यमयी प्रभात येइल ३

" चिरशांतीचा मधु-मंदानिल
मलूल जगता फुल्ल करील.
प्रसन्न जगतीं उज्ज्वल, मंगल
स्वातंत्र्याचा रवि उगवेल. ४

—: ३ :—

रुढिहिमें हत, खुजट, निमीलित
मानवतासुम होइल विकसित.
राहिल जगतीं एकाचि धर्म
सत्य, सनातन निर्मल, निर्मम;
धर्माचें ज्या उदात्त सार,
सर्वांभूतीं एकाचि ईश्वर';
विरक्त, अविरत कर्माचरण,
धर्माची ज्या आज्ञा पावन;
ज्या धर्मापरि विवाहबंधन,
दों जीवांचें शाश्वत मीलन. ५
भेद भंगुनि होईल मुक्त
मानवतेचा बद्धस्रोत.
विमुक्त मानव मानिल केवल
प्रेमाचें दृढ बंधन निर्मल.
बंधुप्रेमें तव वक्षावरी
नांदतील तव बाळें सारीं
श्रीमंतांचा ऐदी, चैनी
वर्ग गडे ग लुप्त होउनी
रसिक, ज्ञानी कामकऱ्यानी

भरेल तत्र ग कूस साजणी !
मातेच्या ग स्तन्याकारितां
करील कलह न हीं नव जनता.
नांगर, चरका, दोन आयुधें
करितिल जीवन सुखमय सार्धे. ६

"बालपणींची निर्मल ऋजुता,
शुचि ललनांची मधु मार्दवता,
गोड फुलें हीं नव्या युगीं या
फुलतिल हृदयीं सकल जनांच्या
ललितकळा ग निशिदिनिं भरतिल
घरोघरीं शुचि सौंदर्यजल. ७

" गडे मेदिनी, अश्रु आवरी,
जाइल निघुनि कृष्ण शर्वरी;
आनंदाचें, सौंदर्याचें,
प्रेमाच्या शुभ साम्राज्याचें,
कविसृष्टींतील, ऋषिहृदयांतिल
नवयुग बाई, जगीं उगवेल." ८

## शरद्

मळकट, हिममय शिरिं मुंडासें,
विरल ढगांचीं अंगिं लक्तरें,
डोईवरि धान्याचा भारा,
ढाळी गालीं दंवजलधारा;
मंद पदें चालत ये भूवरि
शरद् भासला जणुं शेतकरी
युगांयुगांतुनि दलित भिकारी,
चालुनि आला जो शेतकरी
रात्रंदिन शेतांत राबुनी,
उन्हापावसामाजीं शिणुनी,
निजकष्टाची मिळकत सारी
घाली जो दुसऱ्याच्या दारीं !
भाई ! धीर धरीं ! बघ पुढतीं !
मान उचलुनी पाही वरतीं !
धीर पदें चल ऐक्यपथावरि,
अढळ खिळवुनी नजर ध्रुवावरि !
दूरदूरच्या क्षितिजांवरतीं
अस्फुट भासे वसंताकृती !

ऑक्टोबर १९४२

# संन्यासिनी

किल्ल्याच्या बुरुजावरतीं, उभि बाला गद्गद गात;
जाहली कृश तनू दुःखें, जणु कारुण्याची मूर्त;
नेसली शुभ्र वस्त्रातें, केशभार वाहे मुक्त;
        नयनीं कारुण्यें भरित
        तळपे प्रेमाची ज्योत,
        तन्मय बाला गानांत-
"आत्मयज्ञ करण्यासाठीं, जाई संन्याशा जाई!" १
"पथधूलिभरित जरि कपडे, तनु पथश्रमें ही म्लान;
दशवर्षांनीं ही पहिली जरि भेट आपुली जाण,
जरि पहात होतें तुज मी कंठीं या धरुनी प्राण,
        चाऱ्यावरि आशेच्या या
        जरि मृतप्राय मम हृदया
        पोशिलें हृदयिंच्या राया
आत्मयज्ञ करण्यासाठीं, जाई संन्याशा जाई! २
"बा भीषण तांडव करि ही जरि कभिन्नकाळी रात,
बेबंद करित कल्लोळा, जरि वाहे झंजावात,
पशुपक्ष्यांच्या आक्रोशें हादरे अरण्यप्रांत,
        जरि नको, नको ग बाई!
        ऐशा या दारुण समयीं,
        शत्रूही फिरणें हृदयीं,
आत्मयज्ञ करण्यासाठीं, जाई संन्याशा जाई! ३

"मारुनी मिठी करपाशें. नच केलें तव पद बद्ध;
नच केलें म्या तव हृदया मम करुणालापें विद्ध;
नेत्रींच सुकविले अश्रू, कंठींच कैद आक्रंद;
हृदयाचा नाजुक पाश,
नयनींचा मूकाक्रोश,
आवरूं कशी मी यांस ?
आत्मयज्ञ करण्यासाठीं, जाईं संन्याशा जाईं!" ४

"कर्तव्याखातर मरती प्रेमदीप्तहृदयी वीर;
कर्तव्यप्रेरितहृदया प्रेमास्तव ललना धीर;
कर्तव्यश्रेय नरातें, प्रेम स्त्रीजीवितसार;
तव रण बा गर्द जगांत,
मम निवांत गृहगर्भांत,
रणिं मरुनी होऊं मुक्त-
आत्मयज्ञ करण्यासाठीं, जाईं संन्याशा जाईं!" ५

जयसूचक दुंदुभिघोषें जाई अंबर दुमदुमुनी;
सजली आनंदी नगरी विजयोत्सवशृंगारांनीं;
परि, बाला बसली समरीं मृततनुतें कवटाळोनी;
हृदय शून्य, शोकें तप्त;
अश्रू न दीप्त नयनांत;
गुणगुणे शब्द ओठांत-
"मुक्तिवधू वरण्यासाठीं, जाईं संन्याशा जाईं!" ६

—: ८ :—

" तव लग्नाचा सोहाळा पावन सुरगंगातीरीं;
करवल्या दिव्य या तारा सजवुनी आणिती नवरी;
लाविला पुण्य रुधिराचा सौभाग्यतिलक निटिलाग्रीं,
स्वर्गाच्या द्वारीं, बाला,
घेऊनी यशाची माला;
उत्सुका, उभी वरण्याला,
मुक्तिवधू वरण्यासाठीं, जाईं संन्याशा जाईं ! " ७

डिसेंबर १९२६

## हिमगीत

हिम दाटलें सृष्टीवरीं
हिम दाटलें हृदयांतरी
निष्पर्णतरु-शाखेवरी
द्विज बैसुनी गाई परी-
गाणीं, मुकें, अतिदूरच्या
मधुकालिचीं सुखदायि त्या.
तीं ऐकुनी, हृदयांतुनी
मम साद त्या जाई झणीं.

डिसेंबर १९३५

## भूमाईची अंगाई

(चाल—पाळण्याची)

गाई, भूमाई। अंगाई। आंदोलित निजहृदयीं।
बाळें, मृदु हृदया। माउलिच्या। येतीं जीं झोंपाया।
मानव निर्मित त्या। नियमांच्या। अन्यायें पोळुनियां ॥१॥

"झोंपा बाळांनों,। छकुल्यांनों,। जिवलग कामकऱ्यांनों,।
पोशियलें हातें। निजरक्तें। मानवता वृक्षातें;।
अस्थींनीं तुमच्या। रचिला या। सुधारणेचा पाया;।
ललितकला फुलल्या। टवटवल्या। थडग्यांवरतीं तुमच्या।
खेड्यांची झाली। रांगोळी। शहरें तेथें वसली.।
निर्मल घरटकुलीं,। हवा खुली,। रविकिरणेंही गेलीं;।
आली नरकपुरी। अंधारी। तुमच्या निढळीं, शहरीं;।
श्रीमंती ऐदी,। स्वच्छंदी। परि, लोळे प्रासादीं ॥२॥

"झोंपा बाळानों,। छकुल्यांनों,। जिवलग गृहदेवींनों।
पावन मातांनों,। भगिनींनों,। सुशील, पुण्य सतींनों,।
अंध समाजाच्या। रूढींच्या। लोहशृंखला जाड्या।
पदिं असुनी तुमच्या। औदार्यां। आलां प्रगटवुनीयां।

क्रमांक ...... नों: दि: ......

दिव्य प्रेमानें । त्यागानें । सत्त्वाच्या तेजानें ।
लाजविलें तुम्ही । देवांही । धन्य धन्य । ग बाई ! ।
पर्जन्यें गढुळ, । मधुकाल । येतां सरिता विमल; ।
परि अबला भोळी । जंव मळली । पौरुषपशुता चिखलीं, ।
अखंड ती पतित; । ही रीत । न्यायाची जगतांत ! ॥३॥

“ झोंपा बाळांनों, । छकुल्यांनों, । स्वतंत्रताभक्तांनों ।
निधड्या छातींचा । त्यागाचा । कोट रचुनि वज्राचा, ।
सत्याची ज्योत । अखंडित । जागविली प्रज्वलित ।
उज्ज्वल तत्त्वांनीं, । भावांनीं । स्फुरणाऱ्या हृदयांनीं, ।
धिःकारुनि गोळ्या । तोफांच्या । हालातें भोगुनियां, ।
झटलां स्वातंत्र्या । दुबळ्यांच्या, । दुःखित दीनजनांच्या ॥४॥
मे १९२६.

———

## स्वातंत्र्याचें मोल

दिलें असे भरपूर, आम्ही दिलें असे भरपूर !

स्वातंत्र्याचें मोल, साचें

वीररुधिर बिनमोल, आम्ही दिलें असे भरपूर ! ध्रु.

शूर महात्मा ध्वजा उभारी,

फुंकी आपुली दिव्य तुतारी,

विकलभूत नवजीवन वितरी;

यज्ञ कराया जमती त्यजुनी जन निजसर्वस्वास ! १

स्वातंत्र्याचा यज्ञ निर्मिती;

संसाराची होळी करिती,

प्राणांचें बलिदान वाहिती;

आत्मयज्ञतेजें युवयुवती आणिति भूवरि स्वर्ग ! २

अर्धी भाकर निजमुखिंची ती

भणंग शेतकरीही त्यजिती !

स्वातंत्र्यास्तव शौर्यें लढती;

कारागारीं, लाठ्यांखालीं साहिति हाल अघोर ! ३

झेंडा उन्नत उभारुनीयां,
धैर्यें साहुनि निर्दय लाठ्या,
कुसुममृदुल ललनाही लढल्या !
कळवळुनीयां, स्फुंदुनि, फत्तर होती ओलेचिंब ! ४

चरणस्पर्शे अपुल्या, सगळीं
कारागारें कभिन्नकाळीं
युवयुवतींनीं पुनीत केलीं;
शिलाभित्तिमाजीं दुमदुमला स्वतंत्रता जयघोष ! ५

स्वातंत्र्यें जीं हृदयें स्फुरतीं,
अमर मृत्युलोकीं तीं असतीं;
झेलित गोळ्या शौर्यें पडतीं,
चितेंतुनी परि जन्मा येतीं होउनि तेजःपुंज ! ६

* * *

स्वतंत्रतेच्या दिव्य मंदिरीं,
जमलीं जगिचीं राष्ट्रें सारीं
खिन्न उभी भारतभू द्वारीं,
मंदिर भरलें अंधःकारें, भासे शून्य भयाण ! ७

भारतभूच्या ऊर्जिततेस्तव,
अखिल जगाच्या सुखशांतीस्तव,
विश्वकुटुंबा स्थापायास्तव,
अवश्य, होणें तुटुनि शृंखला मुक्तबंध हा देश ! ८

सुवर्णदिनिं त्या भारतभूच्या,
स्फुरतिल ऊर्मी चैतन्याच्या;
प्रतिनादें उत्सववाद्यांच्या
दक्षिण–सागर, उंच हिमालय अखंड दुमदुमतील ! ९

सप्टेंबर १९३०.

———

## उषा.

( १ )

प्रभात तारा चमके गगनीं,
मृदु, मधु तेजें खुलवी अवनी;
निर्मल, सुंदर उषा तशी ती
नाचत येई क्षितिजावरती. १

बघुनि उषेच्या मनोज्ञ लीला,
प्रभात तारा मोहित झाला;
अनिमिष नयनें निरखी तिजला;
पाहुनि लज्जित होई बाला.
लाजुनि ललना होई लाल,
करयुगिं लपवी निज मुखकमल. २

'शिवूं नका मज' वदत, वदत ती
जाई जवळीं, क्षणांत परती;
जातां, जातां हळूच वळूनी
बाला पाही मागें मुरडुनि.
परतुनि जाई संनिध नाचत;
तारा गुंतवि स्वकरीं हात.
चपला बाला सोडवुनि कर,
हांसत, निसटुनि जाई दूर. ३

इतुक्यामाजी वरुनी, धवल
येइ तरंगत अंबुदशकल
तयाआड तो लपे सत्वरी;
प्रियासि धुंडी उषा घाबरी.
ढगाआडुनी सरकुनियां क्षणिं,
घेई निजकरिं करांबुजां झणिं;
करांबुजांवरि, मृदु पदकमलीं,
अमित चुंबनें वर्षि कपोलीं;
निमिषीं होई बाला कोमल
लाजलाजुनी लालीलाल;
हळूच लोटित नाजुक हस्तें,
मुखें गुणगुणे, 'सोडा जास्तें'
इश्श ! पुरे कीं अतां साजणी !
थट्टा करितिल ना सोबतिणी.'

मनीं मनीषा तृप्त न होई,
उगीच बोले बाला विनयी,
गोड नकारें, विनीत ललना
आनंदवितां सदा प्रियांना.
यापरि बाला लीला नाना
करीत होती अंबुजवदना.
ताराही तिज मार्मिकतेनें,
रमवित होता रसिकपणानें. ४

निसर्गमाई प्रेमभरानें,
देई त्यातें आशिर्वचनें;
'नांदो देवा हा चिरकाळ
आनंदानें जोडा प्रेमळ.' ५

[ २ ]

विजयोन्मादें मत्त होउनी
चढे उदयगिरि धुंद दिनमणी;
अगणित मदिरा– मदिराक्षींतें
सेवुनि तृप्ति न तिळहि जयातें;
विषयी हृदयीं ज्याच्या सगळे
नाजुक, कोमल भावहि मेले;
यद्‌हृदयींच्या वातावरणीं,
सुटे घाण तीं प्रेतें कुजुनी
कुजलेल्या त्या प्रेतांवरती,
क्षुद्रवासना कृमि बुजबुजती. १

लावण्यानें मुसमुसणारी,
बघुनि उषेची मूर्ती गोजिरी,
मलिन, अमंगळ दृष्टी तिरवी
पुण्यवपूवरि खल तो खिळवी.
जेवीं मृगतनु गोंडस, मांसल
मिटक्या मारित निरखी शार्दुल. २

मिटुनी लोचन निसर्गमाई
परमेशातें चिंती हृदयीं,
'धांव झणीं बा अनाथनाथा,
रक्षी विमला तव ही दुहिता;
सौंदर्याची मंगल मूर्ती
भग्न कराया दुर्जन पाती.' ३

खल पसरी कर स्पर्श कराया—
विरे उषेची निर्मल काया!
सौंदर्याच्या अखंड सागरिं,
अविरत येती, जाती लहरी;
अशुभ भावना दिसतां दुरुनी
जाती झणिं त्या लहरी विरुनी. ४

निसर्गमाई ऊघडी नयना,
शून्य अंबरीं कुणी दिसेना;
माउलिच्या शुभ चरणावरतीं
फुलें दोन, परि उमलत होतीं, ५

डिसेंबर १९२२.

---

## सोन्याचा दिवस कधीं येणार ?

स्वातंत्र्याचा तो सोन्याचा दिवस कधीं येणार ?
दिवस कधीं येणार ?
शृंखला तुटुनी या पडणार ?

[१]

राष्ट्रांची ही पुण्य, पुरातन माता बंदीवान !
माता बंदीवान !
हिंदभू मुक्त कधीं होणार ? १

भाऊ आम्ही मातेचा कधिं दशादिशिं जयजयकार
दशादिशिं जयजयकार
जमुनियां एकादिलें करणार ? २

हिमालयाची उन्नत शिखरें स्वातंत्र्याचा शांत,
स्वातंत्र्याच्या शांत
घोषणें कधिं हीं दुनदुमणार ? ३

दक्षिणसागर निजभगिनीच्या बंधमुक्त चरणांस,
बंधमुक्त चरणांस
आपुल्या हातें कधिं चुरणार ? ४

[२]

शांतीचें साम्राज्य पसरुनी, साम्राज्याची हांव,
साम्राज्याची हांव
सारी धुळीस कधिं मिळणार ? १

भेद सारुनी, जगिं मनुजांचे कुटुंब कधिं बनणार,
कुटुंब कधिं बनणार
माता पोशिंदी होणार ? २

भाजीभाकर, वस्त्र अंगभर, 'सुजल, सुफल' भूमींत !
'सुजल, सुफल' भूमींत !
कधीं या घरोंघरीं मिळणार ? ३

शेतकऱ्यांचें, कामकऱ्यांचें स्वराज्य कधि होणार?
स्वराज्य कधि होणार?
नांगर उच्चपदीं चढणार? ४

[३]

स्वातंत्र्याचा सूर्य उगवुनी, समतेच्या तत्त्वांस,
समतेच्या तत्त्वांस
भूतलीं वांव कधीं मिळणार? १

त्या सूर्याच्या उज्ज्वल बिंबा, भातरभूचंडोल,
भारतभूचंडोल,
कधीं हा सामोरा जाणार? २

गुढ्यातोरणें उभारुनी कधि सोन्याचा दिन, हिंद,
सोन्याचा दिन, हिंद,
साजरा आनंदें करणार? ३

पहाण्याकरितां त्या दिवसाचा सुखसोहाळा गोड
सुखसोहाळा गोड!
'शरद्'-तनु जिवंत का रहाणार ४

जानेवारी १९२९.

## सोन्याचा दिवस

[१]

(स्वातंत्र्यदिनाच्या अरुणोदयाचीं अस्फुट पाउलें पूर्वक्षितिजावर उमटत असतांना)

स्वातंत्र्याचा, हा सोन्याचा दिवस उगवुनी आज
दिवस उगवुनी आज
शृंखला तुटुनी या पडणार ! ध्रु.

राष्ट्रांची ही पुण्य, पुरातन माता बंदीवान
माता बंदीवान
हिंदभू मुक्त अजी होणार ! १

हिमालयाचीं उन्नत शिखरें, स्वातंत्र्याच्या धुंद
स्वातंत्र्याच्या धुंद
घोषणें अजि ही दुमदुमणार ! २

दक्षिणसागर निजभगिनीच्या बंधमुक्त चरणांस
बंधमुक्त चरणांस
आपुल्या हातें अजि चुरणार ! ३

गुढ्यातोरणें उभारुनी अजि, सोन्याचा दिन हिंद
सोन्याचा दिन हिंद
साजरा आनंदें करणार ! ४

बघुनी नयनें, शुभ दिवसाचा सुखसोहाळा गोड,

सुखसोहाळा गोड,

शरत्तनु धन्य अर्जा होणार ! ५

[२]

(स्वातंत्र्यदिनीं सायंकाळच्या छाया जमत असताना)

दास्यशृंखला तुटुनि युगाच्या मुक्त जाहला हिंद !

मुक्त जाहला हिंद !

रचूंया ध्येयनिरत नव हिंद !

बंधुबंधुच्या रक्तें रंजित, छिन्न, दुभंगित देश

छिन्न दुभंगित देश !

नांदुदे द्वैतीं ऐक्यें हिंद ! १

सरंजामशाही कोसळुनी, संस्थानी कोटांत

संस्थानी कोटांत

फडकुंदे जनताध्वज गतबंध ! २

भाजीभाकर, वस्त्र अंगभर, शेतकरी-मजुरांस

शेतकरी मजुरांस

पुरवुदे सुजल, सुफल हा हिंद ! ३

समतेचें, जनस्वातंत्र्याचें युग उगवो देशांत !

युग उगवो देशांत !

होउंदे जनतेचा नव हिंद ! ४

सुखी, सुसंस्कृत जनता साची संपत्ती बिनमोल
संपत्ती बिनमोल,
मातुंदे, सुवर्णनिधि नच हिंद ! ५

मानवतेच्या नव्या युगाच्या पावो नेतृत्वास !
पावो नेतृत्वास !
नवोदित, पुण्य, पुरातन हिंद ! ६

१५ ऑगस्ट १९४७.

---

## गरिबांच्या कहाण्या

गाती काव्यें नृपतियशातें,
प्रेमकथा, सौंदर्यस्तोत्रें.
इतिहासाचीं भरलीं पानें
नृपवंशांनीं, युद्धवर्णनें.

+ + + +

भू, घामें सुखमय करणाऱ्या,
घामानें तनु डवडवलेल्या
भूकथंडिनें तळमळणाऱ्या,
तुकड्याकरितां धडपडणाऱ्या,
गरिबांच्या परि करुण कहाण्या
कुणि सांगाव्या, कुणि ऐकाव्या !

जानेवारी १९४१

## अनंतता आणि मानव

आकाश हें ना थांग त्या;
विश्वें किती, संख्या न त्या.
हा कालही, ना पार त्या;
कल्पें किती, ना अंत त्या.

या सूर्यमाला अंबरीं
बिंदू जसे त्या सागरीं !
कल्पें तशीं तीं कालिं या
बिंदूहुनीया सान त्या !

\+ + + +

थंडेल भू एके दिनीं,
जाईल सृष्टी लोपुनी !
अन् शेवटीं ही मेदिनी
जाईल रक्षा होउनी !
त्या संस्कृती पृथ्वीतल्या
विज्ञान तें, साऱ्या कला,
भूतील नामें थोर तीं
जातील तैं शून्याप्रती !

बा मानवाचा मीपणा
विश्वार्णवीं या अंध ना !

जून १९३९

## शिशिर

[१]

ठायीं, ठायीं,    हिमपटलें तीं
रविकिरणांतें    रोधुनि धरिती;
पर्णें झडती,    विहंग पळती,
उजाड भासे    वनस्थली ती.

[२]

परी, सृष्टीच्या    स्फुरत अंतरीं,
गूढपणें, तें    चैतन्य करी
पूर्व तयारी    फुलांफळांची,
वसंतिच्या त्या    अतुल श्रींची.

डिसेंबर १९२७.

---

## निरोप

निरोप देईं, पुसुनि असूं झणि
धारातीर्थीं जाया सजणी.
सम्राट्पदाहि तें विश्वाचें
प्रेमाकरितां लोटिन साचें;

प्रेमाहुनि परि प्रिय मज हृदयीं
झिजणें, मरणें तत्त्वापायीं.
तव अंतरिंचें विमल प्रेम
स्फुरवी हृदया, करि मरणा क्षम.

ललना होती जगुनी धन्य;
पुरुष परी ग मरुनी धन्य.
स्त्रीजीवित जणु ओघ अभंग
स्फुरणदायि रणगीताचा ग;
नरजीवित परि स्फुरती धार
समशेरीची स्वतंत्रतापर.
स्त्रीजीवित सुरगंगेचा ग
अखंड, निर्मल, पावन ओघ;
नरजीवित परि स्फुरित, क्षणिक
त्रुटिततारका-तेजोरेख.

मे १९२६

---

## झंजावात.

वाहे झंजावात!

अंबुधि जोमें गदगद हलवुनि,
अंबरचुंबी लाटा निर्मुनि,
खडकांवरतीं बळें आपटुनि,
चेंदा करुनी, तांडव करीत, वाहे झंजावात! १.

अफाट अंबुदसेना गगनीं
छिन्न करुनियां, पार उधळुनी,
विजयोन्मादें मत्त होउनी,
घालित पिंगा आकाशरणीं, वाहे झंजावात! २.

नभीं भराऱ्या मारित वेगें,
देत टक्करा खडकांसंगें,
फोंफावत हृत, क्रोधावेगें,
वृक्षांसंगें झुंजत, झुंजत, वाहे झंजावात! ३.

फुलें ताऱ्हुलीं, पदरांतोनी,
नेत तोडुनी वेलींकडुनी,
वेलींनाही तरूंजवळुनी,
हिसकुनी घेउनि, धुंद होउनी, वाहे झंजावात! ४.

गरिब बापुडीं शुष्कदलें तीं,
मौजेसाठीं उडवुनि झोतीं,
देत फेंकुनी भूमीवरतीं,
करीत भीषण, भेसुर हास्या, वाहे झंजावात ! ५

फिरतां परि दैवाचें चक्र—
भयाण, उजाड ओसाडीवर,
झुडुपांमाजी, विजन गुहांत,
भटकत भेसुर हेल काढित,
कण्हत, कुंथत, जनें तिरस्कृत, धुळीस मिळुनी जात ! ६.

फेब्रुवारी १९२२.

---

## शरद्.

वरी चांदवा नील नभाचा
शुभ्र ढगांची झालर त्याला;
खालीं पिकलेल्या शेतांचा
पीत गालिचा असे पसरला.
त्याली हिरवळ-शालू वाला,
गळ्यांत दहिंवर-मौक्तिकमाला;
मंद पाउलें टाकित मृदुला,
नाचत निर्झर-नूपरताला,
हिमबुरख्यांतुनि कटाक्ष फेंकित,
येई ठुमकत, लाजत मुरडत.

सप्टेंबर १९२८.

## नंदादीप

बाले, बालपणीं ग मंगल करें जो लाविला सोज्वळ
नंदादीप अजूनि तो जळतसे हृन्मंदिरीं निर्मळ.
हा जाईल वसंतकाल, हिमही कालांतरें जाइल,
देहाची हृदयासहीत जळुनी निःशेषता होइल;
पृष्ठीं मेदिनिच्या अनंत शतकें, मन्वंतरें लोटुनी,
राष्ट्रें, संस्कृति पावतील विलया, स्थित्यंतरे भोगुनी;
कालाब्धींत अथांग, विश्व विरुनी जाईल फेनासम;
ब्रह्मांडें उदयास येउनि पुनः चालेल सृष्टिक्रम.
जीवाच्या जवळीं जळेल परि हा दिव्यद्युती फांकित
नंदादीप अखंड, कालजलधीकल्लोल धिःकारित;
दीपस्तंभ जसा अजिक्य खडकीं, क्षुब्धाब्धिमध्यास्थित,
यत्पादीं फुटती प्रचंड लहरी, झुंजे वृथा मारुत.

मे १९२५.

## जगन्माता

(जाति-उद्धव)

सूर्यास्तीं होतों बसलों ऐकत कांठीं ओढ्याच्या-
लहरींच्या मर्मरनादा, किलबिलगाना पक्ष्यांच्या,

गाईंच्या हंबरण्यातें, मधुरालापा पांख्यांच्या.
तिनसांज ओसरे; जमती
आकाशीं तारापंक्ती;
परि हृदयीं ते गुणगुणती
मिश्रनाद अस्फुट सारे; हृत्तंतू कंपित करिती. १

झोंपड्या पसरल्या होत्या भंवतालीं अस्पृश्यांच्या
तेथुनी भजनरव येई स्फुंदत तीरीं ओढ्याच्या.
पैलतडीं नौबत वाजे देवमंदिरीं कालीच्या.
कर जोडुनि मिटुनी नयन,
आठविलें चित्तीं ध्यान,
जाहलें हृदय तल्लीन;
तों झोंपड्यांतील भजनीं, परिसलें दिव्य मी गान. २

"खोपटांकडे गरिबांच्या फिरवी तव वदना, बाळा;
बा असे वसति मम येथें; मंदिरीं नसे वेल्हाळा;
लेंकरें लाडकीं, दुबळीं, आल्यें त्यां भेटायाला.
भाउबंदकी तुमची ही
नच मुळींच मजला साही,

कारि मम हृदयाची लाही;

जिवलग, हृदया आईच्या, दीनहीनही बाळें हीं. ३

"जरि ओंगळ, मळकीं असलीं, तरि मुलेंचना माझीं तीं?
पारखे तुम्ही जरि झालां बंधुप्रेमा हीनमती.
मज आवडतीं मम बाळें, रक्षीन तयां मी जगतीं.
ज्या क्षुद्र, अमंगळ ठायीं
मोकळीक मजला नाहीं
भेटाया मम बाळांहीं,
राहीनं कशी मी तेथें? शून्य देउळें असतीं ही! ४

"मूर्तीचीं प्रेतें उरलीं; या कधींच मूर्ती मेल्या!
अजि नांगरचरक्यांच्या या नवमूर्ती माझ्या झाल्या.
खोंपटांत नांदतसे मी मजुरांच्या, शेतकऱ्यांच्या.
भाउबंदकी सोडुनियां
अज्ञानी बंधूंतें या
जरि कराल जवळीं अपुल्या,
परतेन तरिच बाळांनों, देउळांत मी या तुमच्या." ५

मे १९२६.

---

नानारंगी फुल्ल फुलांनीं
हृदयकुंज मम गेला फुलुनी;
त्यांत लबाडा बससी दडुनी;
परी फसलासी
आतां तूं हृदयनिवासी ! १

प्रेमदंवानें थबथबलेलीं,
हृदयनिकुंजीं हीं फुललेलीं
कुसुमें खुडुनी, बा वनमाळी,
गुंफिन माळा
तुजसाठीं मी वेल्हाळा. २

सुमनपटल हें दूर सारितां,
लपशील कोठें कमलाकांता?
फुलमाळांनीं बांधुनि, नाथा,
तुजसि करीन
हृत्कुंजीं बंदीवान ! ३

हृदयांतुनिही पळुनी जासी!
शिणलें दमलें शोधुनि तुजसी;

खेळ पुरे करिं आणि हृषिकेशी
सांपडलासी !
मम देहकणांविरलासी !

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
39554 वि:
नों: दि:
9557

अणूअणूंतुनि मंजुल, मंद,
स्फुंदे कंपित वेणुनिनाद,
हृदयीं स्यंदति तत्पडसाद;
गुहांतरिं शांत
झिरपती जेंवि झर शीत. ५

डिसेंबर १९२१.

---

## राजाची संपत्ती.

जेथ प्रजेसी मिळे घरोघर
भाजीभाकर वस्त्र अंगभर
जेथ प्रजाजन सुखी, सुबुद्ध-
राज्य साच तें जगीं समृद्ध.
अमूल्य मानव- रत्नांपुढतीं
फिकीं, अचेतन जडरत्नें तीं;
सुखी, सुसंस्कृत जनता साची
राजाची जगिं शुभ संपत्ती.

ऑगस्ट १९३५.

## अज्ञेयवाद्याचा सवाल.

(सुनीत)

जाणें मी हृदया यदंतरिं स्फुरे नीती तसें प्रेम तें;
जाणें बुद्धिहि सृष्टिच्या उकलण्या गूढास जी यत्निते.
जाणें मी उपकार, पुण्य, अघ तें पीडा परांची असे;
जाणें मी जगणें जगीं विकसुनी जीवीतहेतू असे.

जाणें मी अवनीवरी पसरणें बंधुत्वता, साम्यता,
ध्येयें उन्नत मानवी, जगतिं या, प्रस्थापिणें शांतता.
जाणें मी करणें जगीं सतत हें कर्तव्य माझें असे.
'जास्तींचें सुख साच ज्यात जगतीं जास्तीत जास्ती वसे.'

जाणें मी अवकाश-काल, करिती बुद्धीस जे कुंठित-
जाणें काल, जयांत बिंदु गमतें कोट्यद्व भूजीवित;
जाणें अंबर मी, अनंत भ्रमती विश्वेंच विश्वें जिथें,
ताराबिंदु, असंख्ययोजन असे तेजोनिधी सूर्यतें.

कां बुद्धी शिणवूं परी विफल मी सृष्टीहुनी आगळें
जाणायासि अगम्य 'ब्रम्ह' तुमचें बुद्धीस जें नाकळे!

जून १९३६.

# रसवंतीची फिर्याद.

( चालः—भूपती खरे ते. )

[१]

"हे खुळे कवी मज नटवाया किं ग झटती;
निजरूढिबंधनें लादिति हे मजवरती!
अवडंबर अवजड शद्वांचें जरतारी
मी लेउं कशी ग साधी भोळी नारी?
हा सवा मणाचा प्रासाचा जड तोडा;
त्या वजनानें मम पदयुग, मज उचलेना.
हीं सोन्याचीं पदिं बेडी, साजणी,
सारीं हीं बोजड लेणीं, साजणी,
रुचतील कशी मज बाई, साजणी?
बेगडी सकल हा नटवा नागर साज;
हा तुम्हांलाही कैसा बाई रुचेल?
स्वच्छंदें आम्ही बागडणाऱ्या बाला;
बंधनें जगाचीं नावडतीं आम्हाला.

"जइं साज सोडुनि, निसटुनि नभि मी उडल्यें,
तइं कवटाळिति कवि 'काव्य' म्हणुनि साजातें!
मृदु शद्व निवडिले, छंदि बसविले कष्टें,

जुळविले प्रासही, काव्य कवींचें झालें !
आंधळ्या कवींच्या विचित्र साऱ्या लीला
पाहुनी सयांनों हंसें नावरे मजला.

या कविब्रुवांचे वेडे साजणी,
हे बघुनी लोंचट चाळे, साजणी
मी कंटाळुनि ग गेल्यें, साजणी,

बंधनें बद्ध हीं त्यजुनी आपण अवनी
झणिं जाऊं वरतीं खुल्या अंबरीं उडुनी.
या, चला सख्यानों, फुगडी झिम्मा खेळूं;
प्रेमांचीं गाणीं गात नभीं ग नाचूं."

[२]

ती बोलुनि यापरि गगनविहारी रमणी,
निज सख्यांसि घेउनि गेली व्योमीं उडुनी.
शुचि बालेंतें त्या, स्वतंत्र परि सुविनीत
कांहींहि न दुर्गम अथांग अवकाशांत.
कधिं, विहरे नीरधिनिटिलीं भ्रुकुटीयुक्त;
कधिं, जलधितलीं, ती, रत्नें दीप्त गुहांत;
कधिं नील नभीं, त्या सुरसरितेच्या तीरीं;
कधिं हिमालयाच्या विमळ, धवळ त्या शिखरीं;
कधिं, नंदनवनिंच्या लतानिकुंजीं रम्य;
कधिं, सुधार्द्र, शीतल चंद्रावरि रमणीय.

भेटे कधिं, कधिं ती स्वतंत्र कविहृदयांना
तीं स्फूर्तिपंख निज फुलवुनि बागडतांना;
निजपंख पसरुनी कवटाळी हृदयां ती
तन्मीलन वर्षी काव्यसुधा भूवरतीं;
जलधारा-रविकर-संगम जेंवीं पसरी
त्या इंद्रचापरत मधुर, मृदु छटालहरी;
दिनरजनीसंगम जेवीं अंबरभागीं
मधु रंगावलि त्या ओती जागोजागीं.

एप्रिल १९२२.

---

## आई.

हातीं म्लान मुखांबुजा लपवुनी, ढाळीत अश्रू जलीं,
बाला एक कुणीतरी, तटिनिच्या होती तटीं बैसली;
दुःखाचे बसतां असह्य चरके होई क्षणीं मूर्च्छित;
संज्ञाव्यक्त पुनः पुनः तनुलता भूमीवरी टाकित. १

मूर्च्छासुप्त वपूवरी गिरिसुता शीतोदका शिंपडी;
वारा घालि समीरलोलित दलें, प्रेमें लता बापुडी;
शुश्रूषा करिती विहंगम तसे संगीतकें प्रेमळ—
तालातें धरि मोर, कूजन करी मंजुस्वरें कोकिळ. २

होती केश विकीर्ण, मुक्त कुसुमें वाळूवरी लोळतीं;
नीवीबंध सुटे, तुटे मृदुगळीं मुक्तावली रम्य ती;
झंजावात नभीं प्रचंड सुटतां उद्यान होई जसें
होई चारु तिचें शरीर सहजीं शोकानिळें तें तसें. ३

होई वादळ शांत, आंत; पसरे मुद्रेवरी शांतता;
स्वर्गद्वारिं उडावया सजतसे भासे कुणी देवता—
हस्तें केशकलाप कृष्ण कवळी, टाकी झणीं बांधुनी;
जोडी हात; नभीं स्वदृष्टी वळवी गंभीर, तेजस्विनी. ४

तारालंकृत, नील, शांत गगनीं, ती आर्द्र दीप्तेक्षणें
पाही प्रेमभरें, जणु स्वहृदयें तारापथासी ह्मणे,
'येल्यें मीहि तुझ्या अथांग उदरीं प्राणेश जेथें वसे,
तारा होउनि मत्प्रतीक्षण करी अस्वस्थ जो मानसें.' ५

गेला वेळ निघोनियां न कळतां या मूक संभाषणीं,
अर्धा आक्रमिती प्रवास अपुला झाली नभीं यामिनी;
जागी होउनियां, सबाष्पनयना बाला, समाधींतुनी,
दृष्टी शैवलिनीप्रवाहिं फिरवी कारुण्यनिस्यंदिनी; ६

बोले शैलसुतेप्रती गहिंवरें, बाष्पांजली वाहुनी,
"घेई गे पदरीं मला, कुमक दे या दूरदेशाटनीं—
जाया उत्सुक जीव हा बहु गडे प्राणेशपादांप्रत
कारा ही त्यजुनी असह्य, तनुची तारांगणीं उन्नत." ७

"बाई शैलनिवासिनी, गिरिदऱ्या टाकोनिया वाहत
वेगें धांवतसे प्रवाह तव ना हा सिंधुपादांप्रत?
बद्ध स्रोत तुझा गडे, धडपडे शैलोदरीं, कंदरीं
झाडी पंख ग जीव हा फडफडां, तेवीं तनूपंजरीं." ८

"शुद्ध प्रेम कुणा, कधीं, त्रिभुवनीं दिव्याविना लाधलें?
प्रेमापायिं विशीर्ण पर्वतपदीं होशी ग तूं सोज्वले!
प्रेमावीण असार जीवित जगीं, जीवन्मृताचें जिणें;
भेकाचें जणुं कीं निदाघसमयीं अश्मोदरीं घोरणें—
स्त्रीतें केवळ शून्य, बाह्य जग हें; स्त्री ही गृहस्वामिनी;
नाथास्तें गृह शून्य होय; आजि मी शून्यीं ग एकाकिनी." ९

\+ + + +

टाकाया उडि ती पदाब्ज उचली–थांबे झणीं कांपत !
ओढी गूढ निसर्गशक्ति तिजसी, विश्वेश्वरें प्रेरित !
भासे अस्फुट हांक येत हृदयीं, ‘ आई ’ अशी आंतुन
हाले, लोटि हळूच पोटिं मृदुसें, कांहीं तरी चेतन.
बाळा बावरुनी बघे चहुंकडे, अज्ञातभावोद्गमें,
स्फुंदे ऊर भरोनि, कंठ निमिषीं हो रुद्ध बाष्पोद्गमें.

जुलै १९१९.

---

## जयंती.

(चंद्रकांत)

[१]

“ आर्द्रलोचनें आळवीत तूं करुणालापातें,
काय गहिंवरें कंपित कंठें गासि सांग मातें?
गाणें गाई कारुण्याचें पुनरपि, शाहीरा !
पीळ, गड्या ! तव करुणालापें हृदयाच्या तारा ! ”
थाप डफावरि देउनि गाया सजला शाहीर;
गद्गद स्वरें गाई गाणें, मुखि चमके नूरः—

[२]

आर्यावर्ता पुण्यावर्ता नमन असो तूंतें;
तव यश गातां भरतें येतें उज्ज्वल भावांतें.
राजस्थानीं, एके काळीं, दारुण, घनघोर
यवनांसंगें रजपूतांचें माजे हो समर.
प्रहर उलटला लढतां, लढतां, परि दोन्ही सेना
नाचत होत्या वीरश्रीनें करीत रणभजना.
रक्त क्षितिजीं लालबुंद रवि तेजें फोंफावे,
तमोनिधीसह झुंजत, झुंजत पतन रणीं पावे
चिता पेटवुनि जोहारास्तव, पडतां नाथ रणीं
वाटे सजली दिशा पश्चिमा सूर्याची रमणी.
चौंबाजूंनीं निघे तांबड्या ज्वाळांचा लोळ;
तारारूपी ठिणग्यांचा नभिं लोटे कल्लोळ.
ताऱ्यांच्या त्या मंद उजेडीं रणमैदानांत,
गर्दी एकच उसळे; येई युद्धातें ऊत.
घोडे दौडित, फेंकित भाले, जोमें निकरानें;
रणमर्दांचें झुंज चाललें निधड्या छातीनें.
चकाकणाऱ्या तरवारींनीं टिपऱ्यांचा खेळ
खेळत होते देत वीर ते प्राणांचें मोल.

वीरवृन्दि त्या चल चपलेपरि चमकत हो, होती
सुबक, ठेंगणी, गोंडस एका तरुणाची मूर्ती.
मूर्तिमती वीरश्री भासे मर्दानी वसनीं
यवनमर्दना भूवरि उतरे नील नभांतोनी.
रक्तस्नाता तनू तयाची शोभे हो फार;
अस्तोन्मुख, तांबूस, गोजिरी चंद्राची कोर.
लढतां, लढतां, मोडे भाला, फुटे शिरस्त्राण;
भुरभुर उडती वाऱ्यावरती केश तदा कृष्ण !
फडफडणारी कृष्ण पताका अबलेची बघुनी,
यवनवीर ते वेगें येती तिजवरि चालोनी.
अलक आवरुनि सत्वर आर्या काढी समशेर;
जशी चांदणी जलदसमूहीं तशी स्फुरे नार.

[३]

चुरा जाहला समशेरीचा वारूही पडला;
करी निश्चया यवनवेष्टिता, निःशस्त्रा महिला !
त्वरा करुनियां सुरा खुपसला उरांत आर्येनें !
पवित्र धारा रुधिराच्या तइं निघती वेगानें !
द्वाही फिरवित पवित्रतेची धरातलीं पडती !
यवनकलंकित समरभूमि ती पावन त्या करिती !

## [४]

" प्रिये जयंती, कां केलें त्वां साहस हें घोर ?
समराकरितां नसति निर्मिल्या नारी सुकुमार.
झंजावातासह झुंजावें रांकट वृक्षांनीं;
व्रण बांधावे प्रेमळ्नेनें, कोमल वेलींनीं.
मृणालमृदु तव तनु, रक्तांकित बघुनी, सुर, वरुनी
अश्रु ढाळिती; नभ थबथबलें ताराबिंदूंनीं.
हरिणलोचने, पहा मजकडे, शद्ब एक बोल;
शांतवि तळमळ मम हृदयाची शद्बें बिनमोल."
विनवित यापरि होता स्फुंदत तरुण एक पुलिनीं
निचेष्ट देहा निजदयितेच्या हृदयाशीं धरुनी.
गार पाउलें दाबी स्वकरें, जल घाली वदनीं,
उपवस्त्रें तिज वारा घाली, प्रार्थी ईश मनीं.

## [५]

( साकी )

रात्र संपली, दिसे टवटवी प्रबुद्धपूर्वागालीं;
प्रभाततारा निर्मल तेजें चमके पूर्वानिटिलीं.
मूर्च्छा जाई, उघडी ललना नील नयनयुगळातें;
प्रियतमलोचन गाळिति भालीं उष्ण अश्रुबिंदूतें.
ह्मणे मुखें ती, " धांवा नाथा- " थबके दृष्टिस पडतां

बाष्पजलानें डवडवलेलें कांतनयनयुग वनिता,
अश्रुवृष्टि नावरे तया तइं, आर्द्र प्रियामुख होई;
" प्राणवल्लभे- " ह्मणुनी थांबे, गळा दाटुनी येई.
विहरत होता विहगवृन्द जो फुलवित अंबर गानें,
करुणदृश्य हें पाहुनि थांबे, क्रंदन करि शोकानें !
मंद समीरणिं डोलत होत्या वृक्षलता ज्या मोदें,
दुःखें दुःखित ढाळिति ढळढळ दहिंवरबिंदू खेदें !

[६]

" दुर्गावरती विजयपताका फडकतसे ती, देख;
ढगांत काळ्या, जैंवि बलाका फडफडवी निजपंख.
जोहारांहुनि परतवुनीयां निजदयितांतें वीर,
भेटायातें येती येथें उत्सवगजरीं मधुर.
प्रताप कोठें ? प्रिये कासया आचरिलें त्वां दिव्य ?
नाजुक शिल्पायुधें प्रिये का उपलभंजना योग्य ? "
" खिळले होते शेजेसी जइं, दादा आजारानें,
नव्हतां आपण दुर्गावरि, तों डाव साधिला यवनें.
वेष घेउनी दादांचा मीं, सेनेतें लढवीलें;
दुर्दैवें निःशस्त्र होउनी यवनकरीं सांपडल्यें.
सोबतीण मी दों घटकांची नाथा तुमची येथें
माझ्यामागें भलतें कांहीं करूं नये जीवातें. "

" गतस्मृतींच्या लाटा येऊनि हृदया वाहुनि नेती;
क्षुब्धाब्धींतिल नावेपरि मम हृदय विलोलित करिती-"
"पेटवुनी मीं प्रेमाचा हृदिं ज्या दिनिं नंदादीप,
हृदयिं बसविलें नाथा अपुल्या मूर्तींतें निष्पाप,
आठवतां तो या जन्मींच्या प्रथम भेटिचा सुदिन
हृदय खळबळे, जीव होतसे उगीच व्याकुल, खिन्न.
मीलन करितें दों हृदयांचें पहिली दृष्टादृष्ट;
जन्माआधीं ठरवी ईश्वर जन्माची शुभ गांठ.
झरोक्यांतुनी नयनांच्या तीं परस्परां ओळखिती;
दुव्यादुव्यांची सांगड पडुनी निमिषीं निगडित होती.
प्रभात होती शरदृतूंतिल, मधुर छटांची खाण;
वर्षा संपुनि झालें होतें निसर्ग जीवनपूर्ण.
मुग्ध मेदिनी, यौवनोन्मुखा, हिरवळिमाजीं तनुतें
लपवुनि, ओढित पदर धुक्याचा पहात होती रवितें;
स्पंदत होते तरुलतिकांचे नस जीवनरसनृत्यें;
तुडुंब सृष्टी झाली होती उन्मुख, उमलायातें.
देवायतनीं भवनाथाच्या पूजासाहित्यातें

अर्पुनि, जोडुनि करांजली मी ईशा वंदित होत्यें;

भाविक हृदयें निरखित होत्यें भवनाथाची मूर्ती;

निरखित होत्यें गाभाऱ्यांतिल निरंजनांची दीप्ती;

सुरू होउनी महाआरती कर्पूराज्यसुगंधें

भरलें होतें मंदिर, तैसें मंगळ घंटानादें;

नयनांवाटे मम हृदयाच्या शिरुनी गाभाऱ्यांत,

मूर्ती दुसरी होती नकळत साम्राज्या वसवीत—

स्वातंत्र्याची ध्वजा उभारुनि, करिं धरुनी स्वशिरातें,

कर्तव्यास्तव पेटवुनी हृदिं आत्मयज्ञकुंडातें,

मायभूमिसी उद्धाराया सजलेल्या वीराच्या

सात्त्विक तेजें तळपत होती दिव्य तयाची काया।

दृष्टिक्षेपें क्षणिं मी झाल्यें नाथा, बंदीवान;

आठवतां तो क्षण सोन्याचा हृदय येतसे भरून."

* * *

"अरवलिच्या उत्तुंग कड्यावरि बसुनी पहात होत्यें

सबाष्प नयनें, उदास हृदयें, यवनध्वंसित भूतें.

मायभूमिचें धाय मोकलुनि रडणें बघुनी, हाय!

दुःखावेगें, पुरुषार्थानें स्पंदे ललनाहृदय!

वाटे जाळुनि कोमलतेसी, उपसुनियां समशेर,

हिंडुनि अवनी हनन करावें यवनांचें निष्ठूर.
हृदयापुढतीं तळपे मूर्ती महाकालिची भव्य;
नररुंडांचा हार मृदुगळीं, करकमळीं असि दिव्य.
पुरुष सोडुनी पुरुषार्था जइं वरिती राक्षसवृत्ती,
खाक जळुनि तइं होती साऱ्या ललनांच्या मृदु वृत्ती—
यापरि नाना विचार हृदयीं करीत होते क्षोभ;
उष्णाश्रूंनीं पदर भिजुनियां होई ओला चिंब.
दचकुनि जागी विचारांतुनी झाल्यें, पडतां कानीं
खालुनि, खणखण तरवारींचा नाद, पठारावरुनी.
यवनें वेष्टित, शूर, एकट्या पाहुनि रजपूतासी
पदर खोंचुनी, स्वार जाहल्यें, टांच मारिली निमिषीं;
ओळखिली म्या हृदयनिवासी मूर्ती, जातां जवळीं;
दृष्टी भिडली, हृदयें स्फुरलीं, वीरश्री संचरली;
तळपुं लागली शतपट जोमें वीराची समशेर;
शूर निमाले, भ्याड पळाले, संपे यापरि समर.
मावळता रवि अरवलिच्या शिरिं शेवटचे कर पसरी;
निबिड शांतता पसरे निर्जन, यवनें त्यक्त पठारीं.
संध्याहृदयीं ओती हृद्गत हळूच सायंवात;
सविनय मौनें, रक्तकपोलें, हृदय करी ती व्यक्त.

पळती क्षण झणिं; मधुर चांदण्या स्फुरती अंबरिं नील;
अवतरती जणुं मूर्तीकारें प्रेमस्वप्नें विमल.
किरणबालकें गोजिरवाणीं चल तरुछायेखालीं
खेळुं लागती एका प्रेमी हृदययुगांभवतालीं—"

[८]

( चंद्रकांत )

"उकलुनि तंव मी हृदयपुष्प मम तुजसी अर्पियलें
तातपदींची आण तशी मम कथिलीं वेल्हाळे.
'विमुक्त जोंवरि केलें नाहीं बद्ध जन्मभूस,
तोंवरि करुनी त्याग सुखाचा वरीन संन्यास;
करुनि कमंडलु मम हृदयाचा, घेउनि असिदंड,
जन्मभूमिच्या दुष्मानांना करीन मी दंड—
शपथ अशी मीं असे वाहिली तातपदीं पूज्य,'
वदलों ऐसें; नयनीं पडलें अंजन जाज्वल्य.
कर्णीं अजुनी गुणगुणती तव शब्द ग ते दिव्य,
हृदय तावुनी केलें ज्यांनीं त्वत्प्रेमायोग्य—
'येइल कां सहधर्मचारिणी पुरुषार्था आड ?
धर्मबंधनें करितिल का हो धर्माचा मोड ?
सुखें करा ना त्याग सुखाचा, वरा किं संन्यास;

भोग्य वस्तु नच पत्नी नाथा, प्रेमाची मूस.
होई जरि कां पत्नीसंगम कारण पतिपतना,
पत्नी कशि ती सांगा नाथा, राखाचि ती ललना.
सोबतीण जन्माची प्रेमळ, नाथा, शुचि जाया
उदास हृदया स्फुरणदायिनी, शमवि तप्त हृदया.
संन्यासिनि मी हृदयकमंडलु पुढें पहा केला,
"भिक्षां देही!" घाला भिक्षा प्रेमाची मजला.' "
हवेंत विरती जयंतनिगदित जयंतिचे शद्ब,
तया थबकविति सखीविलोचन अत्यतेजदीप्त.

[ ९ ]

"निरोप माझा सांगा नाथा, दादांना हो हा,
'सुखें ठेवि मी धारातीर्थीं नाथांकीं देहा.'
येत्यें आतां प्राणवल्लभा, निरोप मज द्यावा,
जन्मोजन्मीं मीलन अपुलें होइल, मनिं ठेवा;
जन्माजन्मामाजीं केवळ विरल मृत्युपटल,
चुकामूक ही क्षणिक असे परि सोबत चिरकाल;
पुण्याईचा घडा भरुनियां सायुज्यीं जातां
अखंड नांदत राहिल अपुला संगम मग नाथा."

शाहीराच्या मुखांतुनी तइं उमटेना शब्द,
डफहि बापुडा होई भिजुनी अश्रुजळें कुंद.
स्वयंविनिर्मित शाहीराच्या बघुनी बाष्पजला
शरन्नयनही गुंफिति अगणित अश्रूंच्या माला.

प्रारंभ फेब्रुवारी १९२२ }
समाप्ती नव्हेंबर १९२३ }

---

## केसरी

(लोकमान्यांच्या पुण्यतिथीच्या दिवशींचें लोकमान्यांचें पुण्यस्मरण.)

ती लोकशक्ति सुप्त — जनहृद्-गुहेंत सुस्त
गर्जोनि जागवीत — नरसिंह शूर, धीर. १
सिंहीण लोकशक्ती — देखोनि नाथमूर्ती,
झाडोनि दीर्घ सुप्ती, — ठाके क्षणीं उभी ती. २
शक्तीस त्या प्रबुद्ध — करि केसरी सुबुद्ध,
निजहक्क जन्मसिद्ध — तिज जाणवी धुरीण. ३
हृदिं मूर्ति शांत, धीर — आम्हांसि देइ धीर;
ती गर्जना गंभीर — हृदयीं घुमें अखंड. ४

१ आगष्ट १९३५.

प्र. क्र. ७८४०
(स्थळ प्रत)

नैराश्याची
काळी रात!
वाहे भीषण झंझावात! १

वीर पदें, पथ
चाले वीर;
नच अनुयायी, नच आधार. २

ध्येयदीपिका
धरि करिं, उज्ज्वल;
ध्रुवीं खिळविली दृष्टी निश्चल. ३

बंद घरांतुनि,
फटींतुनी, जन
निरखिती नरवीर निरंजन. ४

वीर दिव्य करि
जगकल्याणा,
जाणिति जन परि धजति न मरणा! ५

रजनीभरि, तो
चाले अविरत;
ध्रुवासन्निधीं जाउनि पोंचत— ६

इतुक्यामाजीं,
विद्युत्पात
भू हादरवी, गगन विदारित! ७

*   *   *   *

शुभ वीरतनू
पडली होती
शिखराहुनि दों हातांवरतीं. ८

भिजवि उषा, तनु
दंवबिंदूनीं!
पदरज चुंबी रवि, किरणांनीं! ९

पुण्य समाधी
विमल फुलांनीं,
वृक्षलता रचिती स्वकरांनीं! १०

अथांग अंबरिं,
दिव्य चांदण्या
गाती जमुनी, सुयशा त्याच्या! ११

नव्हेंबर १९३४

---

# बालक आणि पक्षी.

येऊनि अंगणिं, बालक बोले,
दाणे टिपणाऱ्या पक्ष्यासी,
"उगीच कां रे श्रमसी, दमसी,
वेंचित दाणे वणवण फिरसी!

घर देइन तुज सुबक, मनोहर,
देइन तुजसी मी खायासी.
राजापरि तूं बैसुनि खाशिल!
येउनि राहीं रे मजपाशीं."

मान उचलुनी, कुतुकें, पक्षी
बाळा पाहीन्याहाळोनी.
दूर जाउनी, झाडावरुनी
बोले यापरि "चिउं चिउं" करुनी,—

"नको, नको मज, बाळा, तव तें
सुबक, मनोहर घर सोनेरी!
गवताकाड्यांचें जरि साधें
प्रिय मजला मम घरटें भारी.

"मिष्टान्नाहुनि तव त्या साऱ्या,
टिपलेले ते वणवण फिरुनी
आवडती मज दाणे, बाळा,
श्रमें मिळविलेले म्यां खपुनी !

"सतत खपावें कामकऱ्यांनीं
बैसुनि खावें ऐतखाउंनी !
रीत असे ही वा मनुजांची !
नसे परी ती, बाळा, अमुची !"

वदुनी इतुकें, उडुनी जाई
पक्षी उघड्या वातावरणीं
गात, गात तो आनंदानें,
अपुलीं साधीं, मंजुळ गाणीं.

———

## अंगाई-गीत.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ... वि. ... अ. क्र. ३१५५५ ... नों. दि. ... क्रमांक १५२१

[ महाराष्ट्राच्या भरभराटीच्या दिवसांत स्वतंत्र महाराष्ट्रांतील महाराष्ट्रमहिलांनीं गाईलेले अंगाईगीत. ]

करि वाळा अंगाइ रे ! ॥ ध्रु० ॥

पश्चिम सागर
गर्जत गाई
स्वातंत्र्याचें गीत रे ! १

सह्यगिरीवरि
वाहे वारा
गात यशाचें गान रे ! २

"हर, हर" घोषें
हिंद दुंदुमे
नभीं घुमे पडसाद रे ! ३

अटकेवरतीं
फडके झेंडा
कंप सुटे गिलच्यांसि रे ! ४

विजयी स्वारी
येइल लौकरि
भेटाया छकुल्यासि रे ! ५

(चालः-पदिंचे पैंजण; राग-सारंग, ताल-त्रिताल.)

मरुभूमीवरि
दाटे हिरवळ
पडतां तव ग सखये, पाउल ! १

फुलती सुमनें
म्लान, निमीलित,
मृदु चरणांच्या स्पर्शे प्रेमल ! २

तम ओसरुनी
तव आगमनीं,
मधुर कौमुदी उमले विमल ! ३

चरणस्पर्शें
तव ग सुधामय,
करीं शून्य मम जीवित सफल ! ४

सुगंध वितरी,
सौंदर्य भरीं
मुकुलित जीवितकुसुमीं विकल ! ५

तळमळती मम
हृदयोद्यानीं,
चरणचुंबना, सुमनें सकळ; ६

हृदयीं रमुनी,
तूं मधुराणी
ठेवि सतत फुलवंती फुल. ७

सुबक गालिचा
हरिततृणाचा
फुलवागीं या, उगवे मृदुल - ८

प्रथम दर्शनीं,
मत्प्रेमाचा;
ठेवीं त्यावरि तव पदकमल. ९

जाई निर्झर गात!
"चैतन्याच्या ऊर्मि उसळती,
अुत्साहाचे तुषार उडती,
क्षणोक्षणीं, ज्या तरल जीवितीं,
स्फुरे तिथेंची आनंदाचें गीत दिव्य दिनरात! १

"कोंदट, कुजकें, निश्चल, निश्चित,
क्रांतिशून्य, हें दीर्घ, सुरक्षित,
नको, नको मज मृतवत् जीवित!
जिवंत जीवन चैतन्यभरित, पुरे जरी क्षणमात्र! २

"रक्त सळसळे, बाहु स्फुरती,
नयनांतुनियां स्फुलिंग उडती,
कांपे धरणी पादाघातीं—
जरी क्षण असा मिळे जगाया, धन्य जगीं तो साच! ३

"असंख्य उल्का अवकाशांत
फिरत रहाती अंधारांत;
कोण विचारी त्यांसि जगांत?
चूर्ण होअुनी, चमकुनि जाई, तीच धन्य जगतांत! ४

"हृदयाच्या जरि अुडल्या ठिकऱ्या—
स्फुर्तिपूर्ण जीवितयज्ञाच्या
पसरुनि जगतीं अुज्ज्वल ठिणग्या,
लुटित निरतिशय आनंदातें कवटाळिन मरणास!" ५

* * * *

प्रदीप्त हृदयें, निर्झर गात,
पठारकांठीं जाई धांवत;
आवेशें, अुत्साहें गर्जत,
कड्यावरुनियां, खडकांवरतीं टाकि अुडी निर्धास्त। ६

## फूलपांखरूं.

मधुर, सुगंधी सृष्टी माझी
सुंदर, हसऱ्या सुमनांची !
शय्या माझी तरुवेलींवरि,
झुलत्या मऊमऊ पानांची ! १

पेयहि माझें मकरंदाचें,
सुरस, सुवासिक सुमकोशीं
खेळगडी मम मंद समीरण,
रविकिरणें सुंदर, खाशीं ! २

पानांमधुनि खेळत येउनि,
रविकर मम चुंबन घेती !
मंद समीरण झोके देई
वेलींच्या झोल्यावरतीं ! ३

भासे हा भगवा झेंडा धगधगीत जळती ज्योत! ध्रु.
स्थापिलें महाराष्ट्रातें संन्याशी सम्राटानें;
स्फूर्तीची दिव्य तुतारी फुंकियली संन्याशानें;
संन्याशांनीं राष्ट्रानें रक्षिलें आत्मयज्ञानें;
ताराया संस्कृति, देश,
करुनियां स्वार्थसंन्यास
जागले स्वकर्तव्यास–
आत्मयज्ञकुंडाची त्या धगधगीत जळती ज्योत! १

पेटवी क्रांति, उधळुनियां हृत्स्फुलिंग जो कवि-दास
शिवसंन्याशाच्या दारीं येई जेव्हां भिक्षेस,
निजसाम्राज्याची भिक्षा शिव घाली संन्याशास;
तंव भिडलेली हृदयासी
भगवी छाटी संन्यासी
अर्पी अपुली शिवबासी
जणु दिव्य क्रांतिज्वालेची धगधगीत जळती ज्योत! २

अर्पिल्या शूरवीरांनीं प्राणांजलि रणकुंडांत;
निजरुधिरें मुरारबाजी करि पावन धारातीर्थ;
शूर सिंह कोंडाण्याचा समरांगण करि उज्ज्वलित;

पारतंत्र्य अंधःकार
उधळाया मावळवीर
पाजळती तेज क्षात्र;
त्या दिग्विजयी तेजाची धगधगीत जळती ज्योत ! ३

तट अभेद्य निजछातींचा रचुनि मावळे खिंडींत,
अकाळ मृत्युखिंडीच्या टाकिती उड्या जबड्यांत;
तटमध्यीं तळपे मूर्ती बाजीची रक्तस्नात;
स्वामीकार्याची पूर्ती;
होतांच पडे शुभ मूर्ती;
परि अखंड राही जगतीं
उज्ज्वल स्वामिनिष्ठेची धगधगीत जळती ज्योत ! ४

थडग्यांत गाडुनी काळ्या दगडांच्या बोजड, बंद,
लादल्या जरी लोहाच्या शृंखला दंडिं बेबंद,
बा, स्वतंत्र शूर मराठा होईल कधींहि न बद्ध !
सळसळे रक्त हृदयांत
जोंवरी तेज नयनांत,
तोंवरी स्फुरेल नसांत
जयशाली स्वातंत्र्याची धगधगीत जळती ज्योत ! ५

आक्टोबर १९२७

## स्वातंत्र्याचें बीज.

अंधाऱ्या, कोंदट, घाणेऱ्या,
कृमीकिड्यांनीं गजबजलेल्या,
बीज वसे भू--अंतरीं!
बीज वसे भू--अंतरीं! १

जातिल हे दिन, रुजेल अंकुर;
न्हाणिल दंव तनु, पुशिल समीर,
चुंबिल रवि अरुणोदयीं!
चुंबिल रवि अरुणोदयीं २

फुटतिल पानें, कळ्या उगवतिल;
फुलनी कलिका, फुलें बहरतिल;
भरेल परिमल अंबरीं!
भरेल परिमल अंबरीं! ३

* * * *

बीज रोंविलें हुतआत्म्यानीं
रुजेल, फुलेल एके सुदिनीं;
जातिल दुर्दिन, भारता!
जातिल दुर्दिन, भारता! ४

आक्टोबर १९३३.

## ध्येय—ध्वजा.

उभी अढळ, निर्धास्त ! ध्रु.
मध्यावरि प्रक्षुब्ध अब्धिच्या
खडकीं काळ्या, एकलकोंड्या,
क्षितिजावरि दृष्टी खिळवुनियां,
ध्वजा फडफडे दृढ करकमलीं, वरि बाला निर्धास्त ! १

लाटा फुटती धडकत, उसळत;
वाहे जोमें झंजावात;
वीज कडाडे नभा विदारत;
तिजभंवतालीं निसर्ग घाली भयाण जणु थैमान ! २

कांपवि खडका जलकल्लोळ;
धडके देई वरि झंजानिळ;
हादरवी तो विद्युल्लोळ;
परि तिचिया हृदयावरि करिती अणुहि न ते परिणाम ! ३

भंवतालीं सोसाटे वादळ,
वसे मुखीं परि शांति सोज्वळ,
रोंवुनि पदयुग राही अढळ;
तळपे निश्चय दिव्य लोचनीं, धैर्य दीप्त हृदयांत ! ४

मे १९३५.

---

## भू-गोल.

आठ वर्षांची चतुर, गोड बाला
गात येई गुणगुणत राष्ट्रगीत;
देखुनीयां खोलींत भूमिगोला,
भाउराया निज प्रश्न ती करीत. १

"छान, फिरता, रंगीत दिला गोल
सांग खेळाया तुजसि कुणी, भाई?"
भाउ सांगे फुगवुनी गोड गाल,
"खेळ हा नच, भू-गोल असे, बाई!" २

पृथ्वि अमुची राहतों सर्व जेथ,
सान प्रतिमा हा गोल दाखवीत;
आशियाच्या टोंकास खालतीं ही
आमुची ग प्रिय हिंदभूमि पाही!" ३

वदुनि, वेटाळुनि मृदुल करें गोल,
भारतासी सप्रेम चुंबि बाळ;
नयन मिटले, प्रेमार्द्र चित्त झालें;
बघुनि, बालेचें हृदयसुमहि डोले! ४

डिसेंबर १९३४

# प्रेमाचा ध्रुव.

जग जिंकुनि निजनगरीतें जयशाली जेता येई;
जयजयकाराच्या घोषें नगरी दुमदुमुनी जाई;
वर्षावें, रस्तोरस्तीं पुष्पांची शय्या होई;
जयवाद्यें आघाडीला,
मागें जितनृपतीमाला,
दळभार चहूंबाजूला,
वैभवशिखराग्रीं वसुनी चाले दिग्विजयी जेता. १

निजपर्णकुटीच्या द्वारीं, घेउनी करीं सुममाला
राहिली उभी कुणि रमणी लाउनी दृष्टि मार्गाला.
नृप येतां जवळीं, उधळी शून्यमनें सुमनें बाला;
मग पुनः मग्न ती होई,
लाउनी नजर पथिं पाही;
ठेउनि माला निजहृदयीं,
उत्कंठित नयनें राही चित्रापरि ललना दारीं! २

परि, होती नयन नृपाचे बालेवरि खिळुनी बद्ध;
थबके वारू, भूपाची गति होई निमिषीं रुद्ध;
लावण्य दिव्य बघुनीयां नृप होत कुसुमशरविद्ध;
उतरे, आणि सान्निध जाई;
दळ थांबे ठायीं, ठायीं;
बाला तंव जागी होई,
बद्धांजलि नृपती बोले प्रेमदीप्तनयनें तिजसी. ३

“शुभ्र, शांत ज्योत्स्ना भासे नांदे तव निर्मल निटिलीं;
मृदु, मधुर उषा गगनींची जणु नाचे अुज्ज्वल गालीं;
जणु तारालंकृत रजनी तव अथांग नयनीं भरली;
तव तनूतुंनी, तनुलतिके,
सौंदर्यप्रभा जणु फांके,
लावण्य विमल जणुं ठपके,
दिग्विजयी जेता, अबले, तव बंदिवान अजि होई! ४

“मज बद्ध करुनियां, बोले, फुलमाळांनीं प्रेमाच्या,
बंदिवान करुनी ठेवी सुमकुंजीं निजहृदयाच्या;
होअुं दे धन्य मज, तव या पदकमलरजा चुंबुनियां;
नमवी शिर जग ज्यापुढतीं,
कांपती बघुनि ज्या नृपती,
तो ठेवि शिर पदांवरतीं;
खिळुनी मी राही, ललने, बंदिवान तव पदकमलीं! ५

“तारका दिव्य तूं नभिंची, खद्योद मी महीवरतीं,
स्वर्गीय तरल चपला तूं, मी स्फुलिंग अवनीवरतीं,
देवताच मूर्तिमती तूं, मी मानव तुजसी प्रार्थी;
मम हृदयाच्या शैवालें
गुंतवुनी तव पदकमळें
ठेवूं दे मजसी, विमले,
बुटमळे हृदय तव पायीं, बंदिवान चरणीं होई! ६

"वसवुनी विमल तव मूर्ती हृदयाच्या देव्हाऱ्यांत,
प्रेमाच्या नंदादीपा ठेवीन जळत अश्रांत;
कुसुमांजलि सर्वस्वाची वाहीन तव पदीं सतत;
स्वामिनी अससि तूं ज्यांची
पंचारति त्या प्राणांची
ओंवाळिन तुजवरि साची,
तुजविण शून्य जग मानी बंदिवान हा, तव देवी!" ७

कर जोडुनि, अवनतवदना बोले तंव लज्जित बाला,
"वा जयशाली सम्राटा, मानी तव कन्या मजला;
मम हृदय असे अर्पियलें मी अन्य वीरपुरुषाला;
मम सर्वस्वाचे नाथ
असती सैनिक सैन्यांत;
साधे, परि हृदयिं उदात्त,
नम्र दीनदुबळ्यांपुढतीं, दुष्टांसी कर्दनकाळ!" ८

"वैभवशाली भूपाला, मी साधीभोळी बाला;
अनुरूप कितीतरि तुमच्या असतील मजहुनी महिला
एकदांच, एकत्र चरणीं पडते प्रेमाची माला;
चिर साम्राज्यीं प्रेमाच्या,
सिंहासनिं शुचि हृदयाच्या
सम्राट एक जगतीं या,
हृदय छिन्न झालें तरिही बदलेल न त्याची सत्ता!" ९

## उषा.

मम जीवित पथिं, दिव्य आपुलें
टाकी बाला पाउल पहिलें;
उज्वळित तेजा, जगा उमलवित,
मधुर उषा जणु येई तळपत! १

सुवर्णपरदित, मधुर आपुल्या
सौंदर्याच्या, सर्वस्वाच्या,
घेउनि येई लाजत, बाला
स्वप्रेमाची गुलाबमाला;
अर्पी माला मजसी दयिता,
हृदय थरारे हृदयीं धरितां. २

आनंदाचीं किरणें स्रवती,
हृदयोद्याना प्रफुल्ल करिती;
चैतन्याच्या मधुर मत्लई
डोलविती फुलवंती हृदयीं;
प्रेमाचें मृदु हृत्संगीत
स्फुरे तनूच्या अणूअणूंत. ३

जीवित होई नितांत, मधुर,
जणु गानाची गोड लकेर,
अथवा जणु कवि-हृत्स्फूर्तीचा
प्रवाह सुंदर रसवंतीचा! ४

# वणवा.

येई वडवानळ धडधडत
        वनस्थली क्षणिं करि उध्वस्त!
काळें दृश्य दिसे चहुंवार
        धुमसे त्यावरि काळा धूर.
उजाड, भयाण ती वनसृष्टी
        बघुनि होत मन उदास, कष्टी.
बांकें वळकट वृक्ष करपले
        लतिकाबाला, मृदु फुलबाळें
काळीं, भेसुर कलेवरें तीं
        शोकभरें हृदया पिळवटिती!

*        *        *

खिन्न कल्पना तदा चितारी
        भयाण चित्रें हृदयपटावरि
भविष्यकालिन, काळ्या, भीषण
        मनुष्य वणव्याची त्या दारुण!

*        *        *

उदास, उजाड हृदयीं उगवे
        विचार एकचि तंव आशामय—
जुन्या जगाच्या चितेंतुनी तरि
        जन्मा यावें नव जग सुखमय!

जून १९३७.

---

## अमर विहंगम.

("अमर विहंगम" म्हणजे ग्रीक दंतकथेंतील "फीनिक्स" पक्षी, हा पक्षी दर पांचशें वर्षांनीं स्वतः रचलेल्या चितेंत स्वतःस जाळून घेतो, व त्या ज्वालांतून नवा तेजःपुंज देह धारण करून जन्मास येतो, अशी जुनी कल्पना आहे.)

अमर विहंगम
रचुनि चिता निज,
प्रज्वलित करी निज पंखांनीं!

टाकुनियां उडि,
जळुनी, पुनरपि
जन्मा येई ज्वालांमधुनी,

तेजोमय, नव,
उज्ज्वल, मंगल,
दिव्य तनूतें धारण करुनी!

* * *

स्वातंत्र्याचे
वीरहि निधडे,
आत्मयज्ञ ते निजहृदयांनीं

पेटवुनीयां
जाळुनि घेती;
जन्मा येती अमर होउनी,

ज्वालांतुनियां
यज्ञाच्या त्यां,
तनु अर्पाया पुनरपि यज्ञीं!

———

## स्वातंत्र्य-दीपावली.

केलें ज्या बलिदान वीरमणिंनीं स्वातंत्र्यवेदीवरी,
ज्यांनीं पेटवुनी तनू उजळिली ती दास्यता-शर्वरी,
त्यांच्या दीप्त हुतात्मज्योति गगनीं फांकीत तेजावली
होई भारतिं साजरीं अजि शुभा स्वातंत्र्य-दीपावली!

नव्हेंबर १९४७.

## भग्नहृदय.

नको लाडके माझे ताई
होऊं अशी ग बावरि हृदयीं,
ऐकुनियां मम विचित्र शब्द-
गूढ, अलौकिक हृद्पडसाद. १

मानवमय जगिं कुरूप, कृत्रिम,
जीवन ताई, शक्य नसे मम.
तूं, तारापथ, सागर, पर्वत,
हीं सारीं ग मम जगतांत. २

गर्द अरण्यें पाठीवरतीं,
हिममय शिखरें गगन चुंबिती—
उभे भव्य गिरि ज्या शुभठायीं,
घर माझें ग तेथें ताई. ३

कधीं शांत, ग नील, हिरण्मय,
कधीं क्षुब्ध तो कृष्ण, फेनमय,
जेथें वाहे अथांग सागर,
मनुजकिनाऱ्यां- -पासुनि दूर,
त्या विस्तारीं, उदात्त ठायीं
घर माझें ग जिवलग ताई. ४

शुद्ध, शांतिमय,     दिव्य, सनातन
पसरे जेथें     अनंत गगन,
अनंत जगतें     जेथें भ्रमती
ताल धरुनियां     विश्वसंगितीं,
त्या सुखधामीं,     मंगल ठायीं,
घर माझें ग     जिवलग ताई. ५

ताई, जें या     नितांत सुंदर,
पुण्य शरीरीं     वसे निरंतर,
पवित्र निर्मल,     जनां अगम्य,
आत्मानंदी     रत तव हृदय;
त्या ठायीं, तव     पावन हृदयीं,
घर माझें ग     जिवलग ताई. ६

बंदिवान हा     आत्मा, ताई,
मुक्त व्हावया     अधीर होई,
फडफडवी निज     पंख पंजरीं,
रूढिबद्ध या     भंगुर शरिरीं,
निखिल निसर्गी     विरुनी जाया
तव जीवाशीं     तन्मय व्हाया. ७

नको लाडके माझे ताई,
होउं अशी ग बावरि हृदयीं,
ऐकुनियां मम विचित्र शद्ब—
गूढ, अलौकिक हृद्पडसाद. ८

मे १९२६

---

## निर्मला.

[१]

मधुर, निरागस लतिकाबाला
नांदत होती विपिनीं विमला;
प्रियतम वृक्षा चोरुनि निरखित
विहरत होती लाजत, मुरडत.
मोहक रूपें, मधुर सुगंधें,
वृक्षहृदय ती जिंकी साधें.
सांठवि तो निज हृदयीं प्रेमळ
मूर्ती लतेची सुशील, निर्मळ. १

दुष्ट समीरण
येई हळूच
टाकाया तिज
प्रेमालापें
कितिक लतांचें
पतन करी तो
लतिकेसी परि,
कपट्याचा त्या
लोंचट, लंपट
देईन लतिका

कधिं, मधुमधुनी
चोरुनि विपिनीं,
भारुनि अपुल्या
मोहक, खोट्या.
साध्याभोळ्या
खल फसवुनियां.
पुरता ठावा
काळा कावा;
दुष्ट समीरा
क्षणभरि थारा. २

परस्परांच्या
प्रभातसमयीं
निसर्गमाई
जुळवी मीलन
तरुवर धरिनी
पीत हिमाचा
विहंग गाती
मंगलाष्टकें
रविकररंजित
मंगलाक्षता
वधूवरांवरि
आशिर्वचनें

प्रेमा बघुनी,
एके सुदिनीं,
प्रणयियुगांचे
तरुलतिकेचें.
अंतरपाट
अरुणें रंजित
मंजुरवानें
खड्या सुरानें.
दंवबिंदूंच्या
जणु मोत्यांच्या
सकल वर्षिती,
प्रेमें देती.

मराठी ग्रंथ सं...
अनुक्रम 39554 वि. आ०१..
क्रमांक 9521 नों: दि: 24/11/61

बाला तरुसी स्वप्रेमाची
माला घाली हृत्सुमनांची
आनंदानें निसर्गमाई
कर लतिकेचा तरुकरिं देई.
नयनांचें तंव मीलन होई,
हृदयहि हृदयीं विरुनी जाई. ३

जमुनि करंवल्या हळु कुजबुजती,
डोळे मोडित तिजसी वदती,
“जोडा शोभे किति ग बाई!
राजाराणिच जणु ग किनई!”
इश्श! किती तरि वात्रट बाई!
मुळिं न आवडे थट्टा मज ही!”
बोले बाला लाजत, मुरकत,
कोपें कृत्रिम, हृदयीं प्रमुदित.
खुदखुद हंसती लतिका बाला
लाली येई तिच्याहि गालां. ४

प्रेमभरानें निसर्गमाई
डोळे भरुनी पाहुनि घेई
गोंडस, सुंदर तनु लतिकेची
बांकी, दणकट मूर्ती तरुची;

मनीं गुणगुणे निसर्गमाई,
" दृष्ट न लागो माझी बाई ! "
धरि पोटाशीं ती लतिकेसी,
कुरवाळी हृदिं प्रेमे तिजसी;
गळा दाटुनी ये प्रेमभरें,
प्रेमळ नयनीं अश्रुजल भरे;
बोले माई गद्गद स्वरें,
" उदंड नांदा ग सौख्यभरें ! " ५

स्वर्ग भूवरी निर्मी प्रेम
तरुलतिकेचें निर्मल, अनुपम.
प्रेमाच्या त्या स्वर्गीं नांदे
प्रणयियुगुल तें परमानंदे.
प्रेमाच्या शुचि मधुरमीलनीं
क्षणापरी दिन जाती निघुनी;
भासे त्यांसी जणु दिनरजनी
वेगें पळती पंख लाउनी ! ६

[२]

वर्ष यापरी लोटे नकळत,
प्रेमाच्या त्या तन्मयतेंत.

संपुनियां हिम, कोकिल येउनि,
वसंतागमन ललकारी वनिं.
पुष्पवती तंव लतासुंदरी
खुलुनि शोभे मधुर, गोजिरी.
मोहक नवती मृदुल लतेची
खिळवी दृष्टी समीरणाची;
निरखी काया मृदु मैनेची
भेसुर दृष्टी जणु घुबडाची.
पवित्र, निर्मल लावण्यजल
मलिन कराया मनिं चिंती खल. १

दौडत, दक्षिण वायूवरुनी,
वर्षा येई वसंत सरुनी;
अंबुद गर्जत, वीज कडाडत,
वर्षाराणी थडके तळपत. २

समीर एका रात्रीं काळ्या
घाला घाली वनावरी त्या.
वृक्षहि ठाके ठाण मांडुनी,
द्वंद्वाखातर सज्ज होउनी.
समीर येई सों, सों वाहत,
वृक्ष परतवी टक्कर देत.

क्षुब्ध समीरण तंव फोंफावत,
पिंगा घाली गिरक्या घेत;
त्वेषें, वेगें धांवे गर्जत,
विछिन्न फांद्या करी क्षणांत.
छिन्न वृक्ष तो परि न जुमानित,
अजिंक्य राही धैर्ये झुंजत. ३

दमुनी जाई दुष्ट समीर,
दमे बापुडा वीर वृक्षवर.
इतुक्यामाजीं, दुष्टाच्या त्या
मदतिस येई चपला कृत्या.
गगन फोडुनी, येई धांवत;
पडे कडाडत, वन हादरवित.
लखलखणारा पिंवळा, उज्ज्वल
अग्नीचा जणु ओते लोळ!
क्षणभर, दाही दिशा उजळती,
भीषण नादें त्या हादरती!
चिरी चरचरां वृक्षासी त्या
समीरणाची साखि ती कृत्या.
वृक्षवीर तंव दुभंगुनीयां,
पडे भूवरी उन्मळुनियां. ४

छिन्न, अचेतन प्रियकरतनुसी
कवटाळुनियां निजहृदयाशीं,
नाजुक लतिका मूर्च्छित होई,
शोकभरानें करपुनि जाई.

मदांध, विषयी दुष्ट समीर
ओढी हिसकुनी तिजसी क्रूर!
कोमल लतिका करुणलोचनें
करी विनवण्या आर्तरवानें.
मढ्ढल मूर्ती कारुण्यमयी
पाझर फुटवी नच खलहृदयीं!
शार्दुलहृदया करुण मृगीच्या
कधीं द्रवविती कां किंकाळ्या?

*  *  *  *

जणु कुस्करिली जाई सुंदर
कलाकुसर मृदु, मधुर मनोहर!
भग्नहृदय ती मृतवत्, सुन्न
भूवरि पडुनी राहि अचेतन.
अमित यातना असह्य, अविरत
विकल हृदय तें करिती मूर्च्छित.

निघुनी जाई काळी रात,
प्रभात उगवे मेघकलंकित.
निसर्गमाई केविलवाणी,
म्लान लतेची मूर्ती बघुनी,
हृदय हादरुनी, स्फुंदस्फुंदुनी
रडे लतेसी हृदयीं धरुनी;
बोले गद्गद मग ती स्फुंदत
पर्जन्याश्रू ढाळित अविरत,
“असशी तूं ग बाळे, विमल,
पवित्रतेची मूर्ती मंगल.
अभेद्य कोटीं स्त्री हृदयाच्या,
पहाऱ्यामाजी ग प्राणांच्या,
राहि हिरा स्त्री पावित्र्याचा,
पावन उज्ज्वल, शुचि शीलाचा.
असमर्थ असे खलबल अतुल
स्पर्शायाही अबलाशील.
हृदयिं सतींच्या दिव्य, निर्मल
अखंड तळपे तेजें शील.” ७

उघडी लोचन बाला क्षणभरि,
ठेवी निजशिर मातेच्या उरिं;
कंठाभवतीं कर वेष्टुनियां,
बोले लतिका गहिंवरुनियां,
"येत्यें आई! त्यजुनी जात्यें,
भ्रष्ट, अमंगळ या मम तनुतें;
प्रेमाची तव सोडुनि कूस,
निघतें नाथ- -पदीं जाण्यास."
बोलुनि इतुकें झांकी नयन,
जाई निमिषीं ज्योत विरून! ८

मे १९३१.

---

## हांस, मधुर तूं हास!

(आपल्या लाडक्या बालकाचें मधुर, निरागस हास्य पाहून, प्रेमबद्ध जोडप्याच्या मनांत येणारे विचारतरंग.)

हांस मधुर तूं हास! बाळे, हांस मधुर तूं हांस! ध्रु.
हिमालयाच्या सुधवल शिखरीं, पावत अरुण विकास!
तेंची तुल्य ग तव हास्यास! १
फेनिल निर्झर ओते, वरतीं ज्योत्स्ना करित विलास!
तेंची तुल्य ग तव हास्यास! २

तारालंकृत, उज्ज्वल रजनी स्वागत करि चंद्रास!
तेंची तुल्य ग तव हास्यास! ३
हरिततृणांकित, कुसुमित धरणी भेटे मधुमासास!
तेंची तुल्य ग तव हास्यास! ४
अखिल जगांतिल सौंदर्याची मूस ओतुनी खास!
बाळे रचिलें तव हास्यास! ५
मूर्तीकृति प्रेमाची अमुच्या, आनंदाची रास!
बाळे, हृदयाची तूं आस! ६
हांस मधुर तूं हांस! बाळे, हांस मधुर तूं हांस!

मे १९३४.

---

## आस्तिक.

गळां रुळती कुसुमांच्या माळा, । ललाटीं शोभे चंदनाचा टिळा, ।
परी अंतरींचा रंग काळा, । आस्तिक बा तो खास नोहे! ॥१॥
देवमंदिरीं, देव्हाऱ्यांत । करी पूजा बसुनी सतत, ।
हृदयीं वसविली लोभाची मूर्त, । आस्तिक बा तो खास नोहे! ॥२॥
धर्मविधी यथासांग, । सांजसकाळीं भजनरंग, ।
दिवसा गरिबां लुटण्यांत दंग, । आस्तिक बा तो खास नोहे! ॥३॥
सत्याचा जो मेरू अढळ, । नीतिमत्ता जयाची निर्मळ, ।
लोकसेवा ध्येय उज्ज्वल, । आस्तिक तोची जगीं खरा! ॥४॥

सत्तेपुढतीं नमवी न मान, । दलितां रक्षी रक्त सांडुन, ।
तत्त्वस्थंडिलीं अर्पी प्राण, । आस्तिक तोची जगीं खरा ! ॥५॥

मानवतेचा धर्म सोज्वळ । जनतासेवा विधी निर्मळ ।
जग हें मानी मंदिर मंगल । आस्तिक तोची जगीं खरा ! ॥६॥

ऑक्टोबर १९३४

---

## गोड आठवणी.

रंगली मूक प्रेमवैखरी ! ध्रु.

डोले हिंदोळा वेलीचा मोहरलेल्या फांदीवरुनी;
गाई गाणीं गोड विहंगम पवनविकंपित झोल्यावरुनी;
पर्णांमधुनी पल्याड तळपे पूर्ण चंद्रमा नील अंबरीं
वर्षित धारा रौप्यरसाच्या मल्लइ-तरलित शांत सागरीं.
गिरिकुंजीं बैसलों, प्रेमले, कर घालुनियां करीं !
रंगली मूक प्रेमवैखरी !

*　　*　　*

लपत लाल रविबिंब सागरीं, रम्य रक्तिमा फांके भंवतीं;
कांत पश्चिमा, सागरलहरी, सागरवेला लाल रंगती;
लखलख रत्नें उधळित गगनीं, प्रगटे रजनी, वितळे लाली;

एकवटुनि परि निसर्गेची जणु दाटे लाली सुममृदु गालीं !
वेळेवरि बैसलों, प्रेमले, कर घालुनियां करीं !
रंगली मूक प्रेमवैखरी !

*　　*　　*

रंग निवडुनी उषा चितारी मधुमय प्रणयस्वप्नें गगनीं;
शीड उभारुनि नाव हालली, चाले डोलत सरितेवरुनी;
शीड थरारे मत्लइवरती; भुरभुर उडल्या केंसांमधुनी
गतरजनींतिल गोड स्मृतींचा गंध दरवळे, सुमनें गळुनी !
सुकाणु एका करीं, प्रेमले, कर दुसरा तव करीं !
रंगली मूक प्रेमवैखरी !

*　　*　　*

नितांत शांती पसरे भंवतीं, तारालंकृत अंबर वरतीं;
सुस्त नीलिमा नभीं, तयांतुनि प्रणयस्वप्नें जणु लुकलुकती !
स्वप्नाळू तीं कुसुमित झुडुपें मंद समीरणिं सुस्त डोलती;
कुठुनि तरी नभिं विहग एकला हृदयांतुनि निज गाना ओती.
शिळेवरी बैसलों, प्रेमले, कर घालुनियां करीं !
रंगली मूक प्रेमवैखरी !

डिसेंबर १९४७

## स्वप्नमय सागरवेला! *

कर घालुनियां करीं
बसूं ग प्रशांत पुलिनावरी!
भंवतालीं पसरली
स्वप्नमय सृष्टी अवनीतलीं!

*   *   *

तारालंकृत वरी
विराजे नील नभीं शर्वरी—
हृदिंची तव विखुरली
खाण जणुं रत्नांची अंबरीं! १

ताराकर फांकती
फेनमय काळ्या जलधीवरी;
शुक्राची चांदणी
रुपेरी पूल रचित सागरीं! २

वीचिवृंद आदळे,
फुटे हा गर्जत वेळेवरी;
उभ्या कृष्ण आकृती
गिरींच्या दूर अंतरावरी. ३

शुभ्र शीड एकलें
तरंगे सुनील क्षितिजावरी;
उजळित दाही दिशा
फिरे हा दीप खडकिं सागरीं ४

मंदानिल सळसळे
सुरूंच्या काळ्या राईंतुनी;
डोलवीत नारळी
संचरे तरल झावळ्यांतुनी. ५

श्रांत कांत शैलजा
येउनी लीन होत सागरीं;
कर घालुनि जणुं करीं
झोंपली गाढ उदधिच्या उरीं ! ६

कर घालुनिया करीं
बसूं ग प्रशांत पुलिनावरी !
भंवतालीं पसरली
स्वप्नमय सृष्टी अवनीतलीं ! ७

---

* सह्यगिरीच्या कुशींत बसलेल्या कारवारचा निसर्गरम्य सागरकिनारा.

मे १९४७.

## एक जग.

जमा, एक व्हा ! जमा, एक व्हा !
अखिल जगाच्या कामकऱ्यांनों !
ठेउनि खालीं शस्त्रें सारीं,
जग जिंकाया जमा बंधुनों ! ध्रु.

[१]

लोहशृंखला तोडुनि टाका !
ध्वजा उभारा स्वातंत्र्याची !
शस्त्रास्त्रांचा न्यास करोनी,
करा समाप्ती जगिं युद्धांची ! १

वेड्या तुमच्या सुदृढ कराया
शस्त्रास्त्रें हीं सारीं जगिंचीं !
राष्ट्रांची ही युद्धें करिती
वृद्धी ऐदी श्रीमंतीची ! २

वृथा कासया रक्त सांडणें
वेदीवर साम्राज्यशाहिच्या ?
गाडुनि टाका धुंद कल्पना
आकुंचित राष्ट्रीयत्त्वाच्या ! ३

निर्जिव, पिवळ्या सोन्याहूनी
सजीव, सुंदर मानवतनुचें
मोल वाढुं द्या जगतामाजी
कामकऱ्यांच्या श्रमी जिवांचें ! ४

[२]

निखिल मेदिनीवरि पसरूं द्या
 शुभ साम्राज्या कामकऱ्यांच्या
बंधुत्त्वाच्या, समानतेच्या
 चिरशांतीच्या, परमसुखाच्या ! १

मानवतेचा धर्म चिरंतन,
 अखिल महीचें राष्ट्र होउं द्या !
शांत महासागर, दोन्ही ध्रुव,
 मर्यादा त्या नवराष्ट्राच्या ! २

जयजयकारें भूमातेच्या,
 जयघोषानें स्वातंत्र्याच्या,
शतकोटी मानवकंठांतुनि
 भू, सागर, अंबर दुमदुमुं द्या ! ३

पारतंत्र्य-हिमवेष्टण विरुनी,
 तळपत तेजें स्वातंत्र्याच्या,
मानवतेच्या गात यशातें
 अवकाशीं भूगोल भ्रमूं द्या ! ४

डिसेंबर १९३०

---

## स्वातंत्र्यदिनाचा महोत्सव.

"दिव्य महोत्सव आनंदाचा
स्वातंत्र्याच्या शुभ दिवसाचा
नागरजन अजि करिति साजरा;
कां खिन्न असा तूं दारिं उभा ?
कां खिन्न असा तूं दारिं उभा। १

"गुढ्यातोरणें दारिं डोलती,
दीपकमाला प्रभा फांकती,
उत्सववाद्यें मधुर निनादति;
कां खिन्न असा तूं दारिं अुभा ?
कां खिन्न असा तूं दारिं अुभा ? २

" नागरजनतति रस्तोरस्तीं,
नभजयघोषें दुमदुमवीती,
नुरली सीमा आनंदासी !
कां खिन्न असा तूं दारिं अुभा ?
कां खिन्न असा तूं दारिं अुभा ?" ३

“राबुनियां रात्रंदिन अमुची
खळगी न भरे या पोटाची;
फरक न लवही अमुच्या निढळीं!
कां खिन्न न होऊं सांग गड्या?
कां खिन्न न होऊं सांग गड्या? ४

“पोर अुपाशी, बाइल निजली,
अन्न-औषधा पैका नाहीं.
हताश हृदया आशा नुरली!
कां खिन्न न होऊं सांग गड्या?
कां खिन्न न होऊं सांग गड्या? ५

भाजीभाकर, वस्त्र अंगभर,
औषध, शिक्षण मिळे घरोघर
सकल प्रजेसी ज्या दिनिं सुखकर,
स्वातंत्र्याचा तो दिन साचा!
जनतेच्या शुभ स्वातंत्र्याचा! ६

मार्च १९४८

---

## अमर गांधीजींस श्रद्धांजलि.

अंधा जातियता, जिथें विषमता नी धुंद राष्ट्रीयता,
यांही मानवता विछिन्न जगतीं; भू बंधुरक्तांकिता !
मानोनी अणु-अस्त्र देव जगतीं, बा लोकशाहीमिषें,
जेथें कामकरी-किसान पिळुनी, साम्राज्यशाही वसे !
मेली माणुसकी ममूळ हृदयीं, थैमान घाली जिथें
नाझी निर्दयताहि लोभजनिता, बा मानवेंद्रा तिथें
नोहे तूं बलिदान पावत तुझी लोकोत्तरा संस्कृती,
भंगे तुंग हिमाद्रि भूवरि पडे, दुर्दैवि या भारतीं !

१२-२-४८

---

## कला आणि जीवन.

समता-स्वातंत्र्याचें स्थापन, । परिपूर्ण सौंदर्यपूर्ण जीवन, ।
मानवतेचें विकासन, । हेंच कलेचें ध्येय आद्य. । १

क्रांत कुसुमा जैसा सुवास, । औदार्य जैसें शूर नरास ।
ज्ञानदीपिका क्रांतीस, । ध्येयनिरतता कलेस तेंवी. । २

कवीची अमरा कलाकृती, । शिल्पकाराची अनुपम मूर्ती, ।
चित्रकाराची उज्ज्वल निर्मिती, । ध्येय-सौंदर्याची संपृक्ती ज्यांत. । ३

सौंदर्याची मनोज्ञ मूस, । मानवी ध्येयें सुवर्णरस,
ओतुनी निर्मिली मूर्ती सुरस, । ललितकलाकृति तीच साच. । ४

डिसेंबर १९४७

---

## जय हिंद! चिरंतन हिंद!

"हे मातृभूमि! प्रिय मातृभूमि! जय मातृभूमि! जय हिंद!
चिरंतन हिंद!"

नव जनतेच्या हृदयनभांतुनि उठुंदे, दुंदुमुदे सुनिनाद!
घुमुंदे दक्षिणसिंधु-तरलतलिं, हिमनग-उन्नतशिरिं पडसाद!

*　　*　　*

कामकरी नव हिंद रचूं द्या कामकऱ्यांचा मंगल देश!
कामकऱ्यांचा देश होऊंद्या ऐदी श्रीमंती निःशेष!
शुभ सरितांचे जलौघ फिरवो विद्युच्चक्रें खेडकुल्यांत!
पाट नद्यांचे सुजल भू करो, वीज तळपुं द्या घराघरांत!
यांत्रिक नांगर खपुनि देशभर होवो सुफलित, श्यामल हिंद!
कापुस-धान्याचे गिरि निपजुनि, होवो पोशिंदा नव हिंद!
जातियतेचे, अंधरूढिंचे, अज्ञानाचे क्षुद्र, अपंग
भेद भंगुनी दुथडी वाहो जनशक्तीचा स्त्रोत अभंग!
शास्त्र-संस्कृती विकसो पेटुनि ज्ञानदीप प्रतिघरटकुल्यांत!
कला विकसुनी होवो सुंदर जनता-जीवन नव देशांत!
निज ममतेच्या, चिरशांतीच्या, मानवतेच्या पुण्य लक्ष्यांत

फडकूंदे ध्वज सतत हिंदचा उंच बिनीवरि हा जगतांत !

*    *    *    *

नवजनतेच्या हृदयनभांतुनि उठुंदे, दुंदुमुदे सुनिनाद !
घुमुंदे दक्षिणसिंधु-तरलतलिं, हिमनग-उन्नतशिरिं पडसाद !
" हे मातृभूमि ! प्रिय मातृभूमि ! जय मातृभूमि जय हिंद !
चिरंतन हिंद !"

१५ ऑगस्ट १९४८.

---

## दौडत येत अरूण !

दौडत येत अरूण !    धृ.

बसुनी अग्निरथीं क्रांतीच्या,
नव, नव क्षितिजें दीप्त कराया,
फेंकित ज्योती नभिं तेजाच्या,
पुराण पूर्वा नवचैतन्यें स्फुरवित येत अरूण !    १

" सरंजामशाहीच्या काळ्या,
गंजुनि पिचलेल्या, रूढींच्या,
गुलामगिरिच्या जुनाट साऱ्या
तोडा बेड्या त्या शतकांच्या," गर्जत येत अरूण !    २

“ नूतन बेड्या आर्थिकतेच्या
निर्दय, काळ्या त्या सोन्याच्या,
बनती लोभी भांडवलाच्या—
बनूं न द्या त्या ! उध्वस्त करा !” गर्जत येत अरूण ! ३

“ उरलीसुरलीं तीं अपरेचीं
स्वप्नें सारीं साम्राज्याचीं
धुळीस मिळवा मत्त मदाचीं !
उधळुनि टाका एकजुटीनें !” गर्जत येत अरूण ! ४

“ ऋद्धिसुखास्तव जगिं जनतेच्या
निर्मा यंत्रबळें वैपुल्या !
नच ऋद्धीस्तव तें थोड्यांच्या !
जय नव जनता ! जय मानवता !” गर्जत येत अरूण ! ५

मे १९४८.

---

## क्रांती.

अुठे ज्योत गगनांत !
अुडुनी ठिणगी पेटे ज्योत;
ज्योतींतुनि वडवानल दीप्त,
रुद्र, भयानक, उज्ज्वल, कांत !
ज्वाला अुठती, गगना भिडती, पसरति दाहि दिशांत ! १

प्रबुद्ध ज्वाला गगनिं गर्जती,
प्रतिनादें दशदिशा नादती,
हादरवित, भरधांव धांवती,
पसरे भंवतीं, दिव्य सुदीप्ती, तम न उरे गगनांत! २

सापजिवाणू विषद, अमंगळ,
क्रूर श्वापदें, घुबडें ओंगळ,
पाचोळ्याचे कुजके डोंगर,
गडद अरण्यें अंधाराचीं खाक जळुनि निमिषांत! ३

सांचुनि उरलेल्या शतकांच्या
राखेंतुनि कुजक्या राशींच्या,
जीर्ण युगांतिल जीर्ण जगाच्या
दग्धभूंतुनी, जन्मा येई नवयुग सुंदर, कांत! ४

अरुणोदय नव, नव्य युगांतिल
ओती किरणें सुभग, सुमंगल,
नवसृष्टीवरि सुखमय, सोज्वल,
वातावरणीं, चैतन्यसरी झिमझिम वर्षति शांत! ५

मे १९४५.

----

तरंगिणीच्या तरल जलावरि
    तरंगताला नर्तकसे
नाचति रविकर विमल, हिरण्मय,
    मानससरसीं हंस जसे! १.

तरुलतिकांवरि, पवनविकंपित
    नृत्य करिति हीं पर्णफुलें;
टपटप झडुनी मृदुल तृणावरि,
    ताल धरिति हीं दंवबळें. २.

त्यजुनि शेज मउ कमलदलांची
    मधुकर अुठती लवलाहें,
मरंद चाखित, घालिति पिंगा
    गात मधुर आनंदें हे. ३.

विटपीं विहरत, गान विहंगम
    करिती सुस्वर, मंजुळसें.
गात, गात, ही तालसुरावरि
    सृष्टी सारी नाचतसे! ४.

मे १९२३.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........................ वि: ..................
क्रमांक ........................ नों दि: ..................

## जयघोष करा!

जयघोष करा! जयघोष करा!
शतकांचीं स्वप्नें साकार!
शिरिं तेजोमय गौरीशंकर,
चरणीं दक्षिणसिंधु–तुषार,—
स्वतंत्र भारत! स्वतंत्र भारत! घोष करा! जयघोष करा! ध्रु

स्वातंत्र्याच्या रणमैदानीं,
वर्षावर्षीं, या शुभ सुदिनीं,
बलिदाना निज केलें ज्यांनीं,—
जनतेच्या त्या वीरमणींचा घोष करा! जयघोष करा!

क्षितिजाखालीं समतासूर्य,
तम ओसरलें, विरेल हिमचय!
नव अरुणाचा, उन्मुख रविचा घोष करा! जयघोष करा!

रचुं जनतेचा भारत सुखकर!
आकांक्षांचा गौरीशंकर,
चरणीं सेवासिंधु–तुषार,—
शुभ नवभारत! शुभ नवभारत! घोष करा! जयघोष करा!

कारवार २६-१-५०.

—

## जय जय महाराष्ट्रदेशा!

भारतभूच्या भव्य सुपुत्रा! महाराष्ट्रदेशा !
जय जय महाराष्ट्रदेशा ! धृ.

पश्चिम सागर गर्जत घोषे स्वातंत्र्याचा तव बाणा!
सह्य उभा नभिं, प्रगटित जगिं तव सैनिकि अभिमाना !
भारतभूच्या स्वातंत्र्याचा कोट चिरंतन हा साचा
तव पुत्रांच्या कणखर, निधड्या, अविचल छातींचा !
ती शूर, धीर वृत्तीची
घन घडण तुझ्या हृदयाची
घडविति गिरि-सागर साची!
या स्वातंत्र्याच्या शूर सैनिका महाराष्ट्रदेशा!
जय जय महाराष्ट्रदेशा ! १.

सह्यगिरीच्या स्कंधावरतीं पठार पसरे पूर्वेस;
गोदा, कृष्णा, विनत कोयना, भीमा सेवेस.
दणकट मनगट नांगर फिरवी, फिरवी यांत्रिक चक्रांतें,
हृदयगिरींतुनि कला वाहती स्फुरवित जनतेतें.

—:१००:—

हृदिं स्फुरे अग्नि ध्येयाचा,
करिं भगवा ध्वज त्यागाचा,
समतेचा, स्वातंत्र्याचा—
बा लढसी अनुदिन ध्येयास्तव, जगिं धन्य धन्य देशा !
जय जय महाराष्ट्रदेशा ! २.

ज्ञानदीप तव प्रथम पाजळी आद्यकवीतें त्या नमन;
प्रथम पाजळी स्वातंत्र्या त्या शिवराया नमन.
हिंदक्रांतिवीरांतें पहिल्या तात्या-नाना-लक्ष्मीस,
हिंदक्रांति-झुंजारा पहिल्या वंदन बाळास.
नत वंदन त्यां सकलांस
नवलाख वीररत्नांस
उजळिली जयें तव कूस;
बा सुधन्य जनका नररत्नांच्या महाराष्ट्रदेशा !
जय जय महाराष्ट्रदेशा ! ३.

कारवार.
२६-१-१९५१

७६४०

## नवोदित चीन.

दारिद्र्याचा, अज्ञानाचा
शतकांचा घन अंधःकार
भेदुनि उदया येई उज्ज्वल
क्रांतीचा शुभ तेजोभास्कर.

दारिद्र्याच्या, अज्ञानाच्या
शतकांच्या त्या तोडुनि बेड्या,
झाडुनि तुटक्या लोहशृंखला,
मान, उभारुनि, हृदयें उमद्या,
जाई शेतकरी सामोरा [illegible]
क्रांतिभास्करा मुजरा द्याया.

खणखण नादें बसे हादरा
निगरगट्ट हृदयांना उपऱ्या
बुरख्यातिल त्या लोकशाहिच्या
अपरेच्या साम्राज्यशहांच्या!

पूर्वेचा रवि उजाळिल पश्चिम
सुखशांतीनें भरेल व्योम.

१ नव्हेंबर १९५०

## माझें मरण.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

यावें मरण मला समरांत ! ||धृ.||

मानवतेच्या स्वातंत्र्यास्तव लढतां रणतीर्थांत ||यावें०|| १

दलितजनांच्या अुद्धारास्तव मांडिन रक्त रणांत ||यावें०|| २

समतेचा ध्वज वरी फडफडे, तेथें रणरंगांत ||यावें०|| ३

देशोदेशींच्या वीरांच्या घालुनि कर हातांत ||यावें०|| ४

"जय मानवता !" "जय भूमाता !" मंगल जयघोषांत ||यावें०|| ५

निखिल जगाच्या चिरशांतीच्या अरुणोदयिं त्या कांत ||यावें०|| ६

जून १९४२.

REFBK-0007640

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# परिशिष्ट.

अनुक्रम वि: ..................

## कवितांचे मासिकातील प्रकाशन. दि: ..................

| कविता | मासिक | अंक | पृ[illegible] |
|---|---|---|---|
| १ जयंती | विविधज्ञानविस्तार | फेब्रुवारी १९२४ | ४[illegible] |
| २ रसवंतीची फिर्याद | ,, ,, ,, | ऑगस्ट १९२४ | ३[illegible] |
| ३ आई | मनोरंजन | जुलै १९२५ | ३[illegible] |
| ४ उषा | ,, | मार्च १९२६ | १[illegible] |
| ५ नंदादीप | ,, | जुलै १९२६ | २[illegible] |
| ६ आशागीत | ,, | नव्हेंबर १९२६ | [illegible] |
| ७ संन्यासिनी | ,, | फेब्रुवारी १९२७ | [illegible] |
| ८ भूमाईची अंगाई | ,, | मार्च १९२७ | १[illegible] |
| ९ निरोप | ,, | मार्च १९२८ | २[illegible] |
| १० लपंडाव | ,, | नव्हेंबर १९२८ | ३[illegible] |
| ११ झंजावात | ,, | जानेवारी १९२९ | २[illegible] |
| १२ शिशिर | ,, | मार्च १९२९ | २[illegible] |
| १३ भगवा झेंडा | स्फूर्ति | जून १९२९ | ६१ |
| १४ सोन्याचा दिवस | चित्रमयजगत् | फेब्रुवारी १९३० | १८ |
| १५ जगन्माता | स्फूर्ति | सप्टेंबर १९३१ | २९ |
| १६ भग्नहृदय | मनोरंजन | ,, ,, | ७३ |
| १७ स्वातंत्र्याचे मोल | चित्रमयजगत् | नव्हेंबर १९३१ | १२ |
| १८ उषा | स्फूर्ति | मार्च १९३२ | ६९ |
| १९ मधुराणी | ,, | जानेवारी १९३३ | ५६ |
| २० निर्झर | ,, | मे १९३३ | ५८ |
| २१ अमरविहंगम | ,, | ऑगस्ट १९३३ | ७१ |
| २२ अंगाईगीत | ,, | नव्हेंबर १९३३ (खास अंक) | |
| २३ स्वातंत्र्याचें बीज | ,, | डिसेंबर १९३३ | ६३ |

| कविता | मासिक | अंक | पृष्ठ |
|---|---|---|---|
| २४ फुलपांखरू | शालापत्रक | मे १९३४ | ६८ |
| २५ बालक आणि पक्षी | ,, | ऑक्टोबर १९३४ | ५३ |
| २६ वीर | चित्रमयजगत् | जानेवारी १९३५ (खास अंक) | ५१ |
| २७ भूगोल | शालापत्रक | एप्रिल १९३५ | ६८ |
| २८ हांस मधुर तूं हांस ! | स्त्री | एप्रिल १९३५ | ८३ |
| २९ प्रेमाचा ध्रुव | ध्रुव | जून १९३५ | ६६ |
| ३० ध्येय ध्वजा | चित्रमयजगत् | ऑगस्ट १९३५ | ६४ |
| ३१ निसर्गसंगीत | ध्रुव | ऑगस्ट १९३५ | ९८ |
| ३२ राजाची संपत्ती | चित्रमयजगत् | ऑक्टोबर १९३५ | ३३ |
| ३३ अज्ञेयवाद्याचा सवाल | ,, ,, ,, | जुलै १९३६ | ३४ |
| ३४ वणवा | ,, ,, ,, | जुलै १९३७ | ७० |
| ३५ हिमगीत | ध्रुव | ऑगस्ट १९३७ | ९ |
| ३६ अनंतता आणि मानव | चित्रमयजगत् | ऑगस्ट १९३९ | २४ |
| ३७ शरद् | ,, ,, ,, | जून १९४२ | २८ |
| ३८ माझें मरण | आनंद | ऑगस्ट १९४२ | १०३ |
| ३९ शरद् | ,, | मे १९४४ | ६ |
| ४० अमर गांधींजींस श्रद्धांजलि | चित्रमयजगत् | मार्च १९४८ (खास अंक) | ९३ |
| ४१ स्वातंत्र्यदिपावली | ,, ,, ,, | नव्हेंबर १९४८ (खास अंक) | ७२ |
| ४२ स्वप्नमय सागरवेला | ध्रुव | नव्हेंबर १९४८ (खास अंक) | ८७ |
| ४३ कला आणि जीवन | चित्रमयजत् | मार्च १९४८ | ९३ |
| ४४ दौडत येत अरूण ! | हिंद | जून १९४९ | ९५ |
| ४५ आस्तिक | आनंद | जानेवारी १९५० | ८४ |
| ४६ जयघोष करा ! | चित्रमयजगत् | मार्च १९५० | ९९ |
| ४७ जय जय महाराष्ट्रदेशा | ,, ,, ,, | एप्रिल १९५१ | १०० |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३१५५५ वि: ३१०७
क्रमांक ७५२१ नों. दि. [illegible]